


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ गुरुवार १ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०




# ठाण्यात ठाकरे सेनेचा विभाग प्रमुख प्रदीप पूर्णेकरवर कार्यालयातच गोळीबार

## गोळीबारासोबत धारदार शस्त्रानेही हल्ला करण्यात आला

### आरोपी पप्प्या शिंदे याला अटक, संतोष कनोजिया, निखिल यादव फरार

**मुंबई/ प्रतिनिधी** : ठाण्याच्या मानपाडा परिसरात ठाकरेसेनेचे विभाग प्रमुख प्रदीप पूर्णेकर आपल्या कार्यालयात पक्षाच्या कामासाठी बसले होते. त्याचवेळी काही आरोपी पूर्णेकरांच्या कार्यालयाजवळ आले आणि एकापाठोपाठ एक पूर्णेकरांवर सात गोळ्या झाडल्या.. त्यानंतर एकीकडे जखमी प्रदीप पूर्णेकरांना काही कार्यकर्त्यांनी तात्काळ रुग्णालयात नेलं. तर दुसरीकडे आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला.मात्र चार गोळ्या शरीरात घुसल्यानं पूर्णेकरांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला.



पप्प्या शिंदे आणि आकाश निमसे या आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतलयं.तर संतोष कनोजिया, निखिल यादव हे आरोपी फरार आहेत.तर एका अज्ञात आरोपीचा शोध सुरु आहे. विशेष म्हणजे प्रदीप पूर्णेकरांना रुग्णालयात दाखल करताना सोबत असणारा पूर्णेकरांचा मित्र पप्प्या शिंदेलाच याप्रकरणी ताब्यात घेण्यात आलयं.पप्प्या शिंदेनेच पूर्णेकरांच्या कार्यालयात बसून आरोपींना हत्येसाठी हिंट दिल्याचाही पोलिसांना संशय आहे.

दुसरीकडे शिंदेसेनेच्या माजी महापौर मीनाक्षी शिंदे आणि त्यांचे पती राजेंद्र शिंदे यांनीच पूर्णेकरांना मारण्याची धमकी दिली असल्याचा गंभीर आरोप पुर्णेकरांच्या भावाने आणि मुलाने केलाय. आरोपींच्या अटकेसाठी पुर्णेकर कुटुंबीयांनी पोलीस ठाण्यासमोर दीर्घकाळ ठिय्या मांडला. एवढंच नव्हे तर पूर्णेकरांचा मृतदेह अँबूल्न्समधून थेट पोलीस स्टेशनसमोर नेत अंत्यसंस्कार करण्यास नकार दिला.

मुळात अंमली पदार्थ आणि बेकायदेशीर बांधकामाविरोधात प्रदीप पूर्णेकर आक्रमक भूमिका घ्यायचे.त्यात पूर्णेकरांच्या मृत्यूनंतर त्यांनी एक दिवस आधी शेअर केलेल्या इन्स्टा पोस्टची जोरदार चर्चा रंगलीय.त्या व्हिडिओत 'एक तर आपला अध्याय संपेल किंवा नवीन अध्याय सुरू होईल' असं म्हटलं होतं.त्यामुळे प्रदीप पूर्णेकरांना स्वत:वर हल्ला होणार असल्याची कल्पना होती☞(पान २ वर)

# एमपीएससी विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री सकारात्मक

## सचिवांची तातडीने बदली करणार



**मुंबई/प्रतिनिधी** : एमपीएससीच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी सविस्तर चर्चा केली. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या मागण्यांबाबत सरकार सकारात्मक असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. या चर्चेवेळी अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी २ ऑक्टोबर रोजी पुकारलेलं आंदोलन तात्पुरतं स्थगित करत असल्याची घोषणा केली.

एमपीएससीचे अध्यक्ष आणि सदस्य यांच्या नियुक्ती आणि हटवण्याबाबत संविधानातील कलम ३१७ नुसार कारवाई व्हावी, अशी विद्यार्थ्यांची मागणी होती. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी एमपीएससी विद्यार्थ्यांसोबत सह्याद्री अतिथिगृहात बैठक घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी पूर्वीचे आणि विद्यमान अध्यक्ष तसंच सदस्य यांच्या संदर्भात तीन महिन्यात न्यायालयीन चौकशी करण्यात येणार असून, चौकशीच्या निष्कर्षाच्या आधारे पुढील कारवाई केली जाईल. एमपीएससीच्या सचिवांची तत्काळ बदली करण्यात येईल, असं मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिलं.

एमपीएससीच्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीनेच घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांशी चर्चा केल्याशिवाय परीक्षेच्या पद्धतीत कोणताही बदल केला जाणार नाही, असं मुख्यमंत्र्यांनी आश्वासित केलं. तसंच आगामी भरतीमध्ये मोठ्या प्रमाणावर पदे भरण्याची तयारी सरकारनं सुरू केली आहे. विशेषतः ३ जानेवारीच्या गट 'क' परीक्षेसाठी जागावाढीची विद्यार्थ्यांची मागणी मान्य करण्यात आली असून, गट 'क'मध्ये☞(पान २ वर)

# अदिती पोहरे काँग्रेसच्या उमेदवार आज पक्षात प्रवेश करणार

**अमरावती/ प्रतिनिधीः-** अमरावती विभाग शिक्षक विधान परिषद मतदार संघासाठी २३ ऑक्टोबर रोजी होणारी प्रतिष्ठेची निवडणूक जवळ येताच राजकीय घडामोडींना वेग आला आहे. भाजपच्या मोठ्या नेत्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन भाजप उमेदवाराला अमरावतीतून लढण्याची संधी मिळावी अशी मागणी लावून धरली आहे. तर दुसरीकडे अदिती ऋषिकेश पोहरे यांच्या काँग्रेसमध्ये प्रवेशाची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.त्या आज गुरुवार १ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे काँग्रेस मुख्यालयात वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश करणार असल्याची माहिती स्थानिक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.




शिक्षक मतदार संघ निवडणुकीत काँग्रेसला अदिती पोहरे यांच्या रूपाने तगडा उमेदवार मिळाला असल्याचे मानले जात आहे. अदिती पोहरे यांना काँग्रेसची उमेदवारी मिळणे जवळपास निश्चित मानले जात आहे. अदिती पोहरे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि राज्य सरकारचे माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख यांच्या कन्या आहेत. त्याचप्रमाणे शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांच्या सून आणि दैनिक देशोन्नतीचे संपादक ऋषिकेश पोहरे यांच्या पत्नी आहेत. त्या प्राध्यापिका असण्यासोबतच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय आहेत.

**अमरावतीचे समीकरण बदलणार-**

अमरावती शिक्षक मतदारसंघात काँग्रेस उमेदवार म्हणून अदिती पोहरे यांच्या एन्ट्रीने येथील राजकीय समीकरणात मोठा बदल होण्याची शक्यता जाणकार☞(पान २

# ३ वेळा अलार्म वाजल्यावरही रुग्णालयातील परिचारिका झोपेत

## सीसीटीव्ही फुटेज समोर, डॉ. सुनील देशमुख यांचे गंभीर आरोप



**अमरावती बालमृत्यू प्रकरणः**

**अमरावती/ प्रतिनिधीः-** जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागात (NICU) २४ ऑगस्ट रोजी पहाटे व्हेंटिलेटरच्या स्फोटामुळे लागलेल्या भीषण आगीत तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या हृदयद्रावक घटनेचे धक्कादायक सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून, आग लागण्यापूर्वी तीन वेळा अलार्म वाजून आणि लाल लाईट चमकूनही कर्तव्यावर असलेल्या दोन परिचारिका लॉबीत झोपलेल्या असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. काँग्रेस नेते व माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी बुधवारी (दि.३०) पत्रकार परिषदेत हे फुटेज जाहीर करत, प्रशासनाचा निष्काळजीपणा चव्हाट्यावर आणला आहे. शासनाच्या चौकशी समितीचा अहवाल वस्तुस्थितीशी विसंगत असून मूळ जबाबदार कंत्राटदारांना वाचवण्यासाठीच तो तयार करण्यात आल्याचा आरोप करत डॉ. देशमुख यांनी या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व सखोल चौकशी करण्याची जोरदार मागणी केली आहे.

जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशू अतिदक्षता विभागात गेल्या २४ ऑगस्ट रोजी पहाटे २ वाजून ☞(पान २ वर)



### उशिरा पोहोचले अग्निशमन बंब

रुग्णालयातील आगीवर नियंत्रण मिळवणारी यंत्रणा निकृष्ट दर्जाची होती, असा आरोप डॉ. सुनील देशमुख यांनी केला आहे. आग पहाटे २ वाजून ५० मिनिटांनी लागली. अग्निशमन दलाचे बंब ३ वाजून ३० मिनिटांनी म्हणजे ४० मिनिटां नतर पोहचले, असा दावा डॉ. देशमुख यांनी केला आहे. आगीसंदर्भात शासनाकडून करण्यात आलेले दावे आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती यात तफावत आढळून आली असून सीसीटीव्हीच्या माध्यमातून अनेक बाबी समोर आल्या आहेत. याची स्वतंत्ररीत्या चौकशी झाली पाहिजे, असे डॉ. देशमुख म्हणाले.

# वैमानिकावर चाकूने हल्ला, स्मित मच्छार यांच्यामुळे वाचले १८० इस्रायली प्रवाशांचे प्राण

**ताबूक, नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** दुबईहून इस्रायलमधील तेल अवीवला जाणाऱ्या 'फ्लायदुबई' या विमान कंपनीच्या विमानामध्ये बुधवारी वैमानिकावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली. या हल्ल्यात जखमी झालेले वैमानिक हे भारतीय नागरिक असून त्यांचे नाव स्मित मच्छार असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेनंतर 'बोईंग ७३७ मॅक्स ८' या विमानाचे उत्तर-पश्चिम सौदी अरेबियातील ताबूक विमानतळावर आपत्कालीन



लँडिंग करण्यात आले. इतर माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, 'फ्लायदुबई'चे 'एफझेड १०७३' (FZ१०७३) हे विमान दुबईहून तेल अवीवच्या दिशेने जात होते. उड्डाणादरम्यान ही घटना घडल्यानंतर विमान ताबूककडे वळवण्यात आले. विमानाचे सुरक्षित लँडिंग झाल्यानंतर मच्छार आणि सह-वैमानिकाला तातडीने स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले. मच्छार यांच्या प्रकृतीबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

त्यांच्या प्रोफाइलनुसार, त्यांच्या नावावर 'बोईंग ७३७-८००' आणि '७३७ मॅक्स ८ व ९' या विमानांचे ९,७५० तासांहून अधिक उड्डाण नोंदवले गेले आहे. यापैकी ६,४०० हून अधिक तास त्यांनी स्पाईसजेटमध्ये 'पायलट-इन-कमांड' म्हणून पूर्ण केले आहे, ताबूक विमानतळ प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक वेळेनुसार बुधवारी सकाळी ८ वाजून ४४☞(पान २ वर)

### दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांतील दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

# फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षा शुल्क माफ

**मुंबई/ प्रतिनिधी** :- राज्यातील दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांमधील इयत्ता १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळालाय. फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षेसाठी या तालुक्यातील विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क न आकारता ऑनलाइन आवेदनपत्रे भरून घेण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं सर्व विभागीय मंडळांना दिलेत.



मदत व पुनर्वसन विभागाच्या २५ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने विविध सवलती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामध्ये शालेय तसंच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीचाही समावेश आहे. या शासन निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्य मंडळाने फेब्रुवारी-मार्च २०२७☞(पान २ वर)




# रोहितचं शतक, शुबमन गिलचं द्विशतकी वादळ!

## भारताचा वेस्ट इंडिजवर ऐतिहासिक विजय

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** भारत आणि वेस्ट इंडिज या दोन्ही संघांमध्ये पार पडलेला दुसरा वनडे सामना हा दोन्ही संघातील गोलंदाजांसाठी वाईट स्वप्नाहून कमी नव्हता. कारण पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी पहिल्यांदाच वनडेमध्ये ४०० धावांचा डोंगर उभारला. यादरम्यान ३ फलंदाजांनी दमदार शतकं झळकावली. ४०६ धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाकडून रोहित शर्माने १०१ धावांची खेळी केली. तर शुबमन गिलने शेवटपर्यंत फलंदाजी करून २२३ धावांची द्विशतकी खेळी करून भारतीय संघाला ऐतिहासिक विजय मिळवून दिला.

**भारतीय संघाचा विक्रमी पाठलाग**

या सामन्यात भारतीय संघाला विजय मिळवण्यासाठी ४०६ धावांचा मोठा डोंगर सर करायचा होता. याआधी भारतीय संघाने ४०० धावांचा कधीच यशस्वी पाठलाग केला नव्हता. २०१३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध झालेल्या सामन्यात भारताने ३६२ धावांचा यशस्वी पाठलाग केला होता. आता वनडे क्रिकेटच्या



इतिहासात पहिल्यांदाच ४०० धावांचा पाठलाग करून भारतीय संघाने ऐतिहासिक विजयाची नोंद करत मालिकेत २-० ने विजयी आघाडी घेतली आहे. भारतीय संघाला इतक्या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी वेगवान सुरूवातीची गरज होती. ही सुरूवात रोहित शर्मा आणि शुबमन गिलच्या जोडीने करून दिली. दोघांनी २५५ धावांची विक्रमी भागीदारी केली. रोहित शर्मा १०१ धावा करून बाद झाला. पण गिलने विराटसोबत मिळून डाव सावरला. विराटने २९ धावा केल्या. तर गिल २२३ धावांवर नाबाद राहिला आणि ऋतुराज गायकवाड ३१ ने खेळी केली. भारतीय संघाने हा सामना ८ गडी राखून आपल्या नावावर केला.

**शुबमन गिलचं विक्रमी द्विशतक**

वनडे क्रिकेटमध्ये द्विशतकी खेळी करणं कुठल्याही फलंदाजासाठी खूप मोठी गोष्ट असते. रोहित शर्मा हा जगातील एकमेव असा फलंदाज आहे, ज्याने ३ वेळा द्विशतकं झळकावली आहेत. आता शुबमन गिल या विक्रमाच्या अगदी☞(पान २ वर)

## श्रीमती नरसम्मा चषक २०२६
# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरण नगर, अमरावती येथे श्रीमती नरसम्मा चषक २०२६, या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन बुधवार दिनांक ३० सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ११ वा. पासून करण्यात आले. सदर स्पर्धेमध्ये उद्घाटनपर कार्यक्रमात अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त श्रीकांतजी काळीकर, तर उद्घाटक म्हणून उमरखेडच्या साकळे विद्यालयातील आनंदीदास महाराज हे होते. यावेळी मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश चंदनपाट, माजी विद्यार्थी अनिरुद्ध महाजन, स्पर्धेचे समन्वयक प्रा. पंकज वानखेडे व प्रा. शीतल खापरे यांची उपस्थिती होती. या प्रसंगी स्पर्धेचे उद्घाटक आनंदीदास महाराज यांनी एकत्रितपणे सर्वांना वक्तृत्व स्पर्धेबाबत प्रेरक मार्गदर्शन केले आणि संत रविदासांच्या जीवनावर प्रकाश टाकला. या उद्घाटनपर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पंकज वानखेडे, संचालन प्रा. पद्मा कडू मॅडम तर आभार प्रदर्शन प्रा. सुवर्णा प्रचंड यांनी केले. ही स्पर्धा वरिष्ठ व कनिष्ठ अशा दोन गटांमध्ये घेण्यात आली. विजेत्या स्पर्धकांना वरिष्ठ महाविद्यालयीन गटात प्रथम पारितोषिक प्रथमेश धायगुडे, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे याला नरसम्मा चषक आणि रोख पारितोषिक ४००० रु., द्वितीय पारितोषिक आदित्य टोळे, राधादेवी गोयंका महाविद्यालय (YCMOU) अकोला याला नरसम्मा चषक आणि रोख रक्कम २५०० रु. व प्रोत्साहनपर पारितोषिक गुंजन सोनारकर, विद्याभारती महाविद्यालय, अमरावती हीला नरसम्मा चषक आणि पुस्तक स्वरूपामध्ये प्रदान करण्यात आले.



त्याचप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयीन गटात प्रथम क्रमांक शिवांजली केवले, बियाणी महाविद्यालय, अमरावती हिला श्रीमती नरसम्मा चषक तसेच रोख रक्कम २५०० रु., द्वितीय पारितोषिक विदुला पिददी, नूतन कन्या कनिष्ठ महाविद्यालय, अमरावती हिला श्रीमती नरसम्मा चषक व रोख रक्कम १५०० रुपये आणि प्रोत्साहनपर पारितोषिक विद्या पवार, बी. एन. बी. कॉलेज, दिग्रस हिला चषक व पुस्तक स्वरूपात देण्यात आले. स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना महाविद्यालयातर्फे प्रमाणपत्र देण्यात आले. दिवसभराच्या स्पर्धेदरम्यान वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयीन गटातील सूत्र संचालन अनुक्रमे प्रा. अरुण मेश्राम व प्रा. सागर बोबडे यांनी केले.

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या तिसऱ्या वर्षाला अनुलक्षून यावर्षी स्पर्धेचे विषय खालील प्रमाणे होते. १) नागरी शिष्टाचाराचे पालन - राष्ट्र उन्नतीसाठी आवश्यक २) संत शिरोमणी रविदास: सामाजिक समरसतेचे अग्रदूत ३) वंदेमातरम् : भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील प्रेरक मंत्र.

या तीन विषयावर सदर स्पर्धा आयोजित करण्यात आली. समारोपीय सत्रामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर भोंदु तसेच प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश चंदनपाट आणि परीक्षक प्रा. शिवाजी आडे (यवतमाळ), पंकज आत्राम (हिंगणघाट), रणदीप बिसने (हिंगणघाट), प्रा. अनुपमा खवसे (परतवाडा), मुख्याध्यापिका विद्या मुऱ्हेकर (परतवाडा) यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. शितल खापरे यांनी केले. स्पर्धेमध्ये दोन्ही गटात एकूण ४२ स्पर्धकांनी सहभाग घेतला. सदर स्पर्धेला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा श्रोते म्हणून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धा आयोजनामध्ये संस्था, महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा बहुमोल सहभाग होता.

## १ व १० वरील उर्वरित

### ठाण्यात ठाकरे सेनेचा

का? असाही प्रश्न निर्माण झालाय.

ठाण्यात याआधीही १९८९ मध्ये शिवसेना नगरसेवक श्रीधर खोपकर यांच्या हत्येनंतर टोकाचा राजकीय संघर्ष निर्माण झाला होता.त्यात आता प्रदीप पूर्णेकरांच्या हत्येमागे नेमकी कोणती कारणं आहेत. पूर्णेकरांच्या हत्येमागचा खरा मास्टमाईंड कोण आहे? याचा सखोल तपास करण्याची गरज आहे. मात्र यामुळे शिंदेसेना आणि ठाकरेसेतला ठाण्यातला संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

### एमपीएससी विद्यार्थ्यांच्या

विक्रमी संख्येनं पदं भरली जाणार आहेत. एमपीएससीच्या विविध परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना वारंवार कागदपत्रं सादर करावी लागू नयेत, यासाठी एकाच कार्डवर सर्व परीक्षा देता येतील, अशी यंत्रणा उभारण्यात येणार आहे. हे कार्ड माफक दरात उपलब्ध करून देण्याची तयारी आहे. तसंच, पुढील तीन वर्षांची पदभरती एकाचवेळी जाहीर करण्याची तयारी करण्यात येणार आहे. निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांसाठी एक वर्ष आधीच भरती प्रक्रिया सुरू केली जाणार आहे. पुढील एका महिन्यात भरतीचं संपूर्ण वेळापत्रक निश्चित करण्याचं नियोजन आहे.

### अदिती पोहरे काँग्रेसच्या

वर्तवत आहेत. अमरावतीतील सर्वात मोठ्या शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांच्या त्या कन्या आहेत. त्याचप्रमाणे भैय्यासाहेब देशमुख यांचे सहकार, शिक्षण आणि राजकीय क्षेत्रात मोठे वर्चस्व राहिले आहे. त्यामुळेही अदिती पोहरे यांची उमेदवारी दमदार असल्याचे दिसून येत आहे.

**नवे राज्य प्रभारी करणार स्वागत-**

काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, पक्षाचे नवे राज्य प्रभारी श्रीवेल्ला प्रसाद यांच्या उपस्थितीत अदिती पोहरे यांचा एकट्याचा पक्षप्रवेश होणार आहे. राज्यातील सर्व प्रमुख काँग्रेस नेते यावेळी उपस्थित राहणार आहेत. राज्यात पाच विधान परिषद जागांवर निवडणूक होत आहे. ज्यात नागपूरची पदवीधर मतदारसंघाची जागासुद्धा आहे. अशा परिस्थितीत काँग्रेसचे नवे राज्य प्रभारी श्रीवेल्ला प्रसाद यांनी मुंबई पक्ष मुख्यालयात पहिली महत्त्वपूर्ण बैठक बोलावली आहे. त्याचवेळी अदिती पोहरे यांचा प्रवेश होणार आहे.

### ३ वेळा अलार्म वाजल्यावरही

५० मिनिटांनी व्हेंटिलेटरमध्ये स्फोट झाला. त्यानंतर भीषण आग लागली होती. या आगीत तीन नवजात बालकांना आपला जीव गमवावा लागला होता. आग लागण्याच्या आधी तीन वेळा अलार्म वाजला. लाल दिवेही चकाकले. त्यावेळी कक्षात सेवेवर असलेल्या दोन परिचारिका लॉबीत झोपल्या असल्याचे सीसीटीव्ही चित्रिकरणात दिसून येत आहे. स्फोटाचा आवाज ऐकू आल्यानंतर दचकून जागे झालेल्या परिचारिका आरडाओरड करतात, नंतर इतर कर्मचारी धाव घेऊन छोट्या अग्निशमन यंत्राद्वारे आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करतात, असे दिसून येत आहे.

अजूनही अहवाल सार्वजनिक नाही-

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी तातडीने अमरावतीत येऊन रुग्णालयाची पाहणी केली होती. त्याच दिवशी राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली होती. या समितीने चौकशी अहवाल शासनाकडे सादर केला आहे, मात्र हा अहवाल अजूनही सार्वजनिक करण्यात आलेला नाही. हा अहवाल लवकरच समोर येईल. त्यातून विरोधकांची तोंडे बंद होतील, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपुर्वी केला होता. परंतु अजूनही अहवाल सार्वजनिक नाही झाला. अहवाल लवकरात लवकर सार्वजनिक करावा अशी मागणी ही डॉक्टर देशमुख यांनी केली आहे.

समितीच्या अहवालात विसंगती-

या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादारला. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षतेमध्ये अकरा सदस्यीय चौकशी समिती गठित करण्यात आली होती. समितीने ७ सप्टेंबर रोजी अहवाल सादर केला. मात्र या अहवालाची स्क्रिप्ट आधिच लिहल्या गेल्याचा गंभीर आरोप माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी केला आहे. अहवालातील काही माहिती वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचा दावा करत, मुळातील जबाबदार कंत्राटदारांना वाचवून डॉक्टरांवर चुकीच्या पद्धतीने कारवाई करण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. व्हेंटिलेटरच्या देखभाली पासून ते घटनेच्या वेळी कर्मचाऱ्यांच्या उपस्थिती पर्यंत अनेक प्रश्न आता सीसीटीव्ही फुटेजमुळे ऐरणीवर आले आहेत. त्यामुळे समितीच्या अहवालाची पुन्हा पडताळणी करण्याची मागणीही जोर धरत आहे.

**फ्लॅट विकणे आहे**

शास्त्री नगर, टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे. एक बेड रूम, किचन, स्वतंत्र डायनिंग, प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

### वैमानिकावर चाकूने हल्ला

वृत्तात देण्यात आली. ताबूक विमानतळ प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक वेळेनुसार बुधवारी सकाळी ८ वाजून ४४ मिनिटांनी विमानाने धोक्याचा संदेश पाठवला होता. त्यानंतर सुमारे एका तासाने विमानाचे विमानतळावर लँडिंग झाले. 'फ्लाईट ट्रॅकिंग' आकडेवारीनुसार, हे विमान अवघ्या ३७ सेकंदांत तब्बल १४,३०० फुटांपेक्षा जास्त खाली आले. त्यानंतर विमानाने अनधिकृत हस्तक्षेपाचा ट्रान्सपॉन्डर कोड सक्रिय केला.

मच्छार यांनी 'फ्लायदुबई'मध्ये थेट 'डायरेक्ट-एन्ट्री कॅप्टन' म्हणून प्रवेश केला होता. त्यांच्या प्रोफाइलवर मुंबईतील 'वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट'मधून बिझनेस ?डमिनिस्ट्रेशन शाखेची पदवी (जून २००७ ते एप्रिल २००८) घेतल्याचा उल्लेख आहे; मात्र त्यांनी वैमानिकाचे प्राथमिक प्रशिक्षण कुठून पूर्ण केले, याचा तपशील तिथे उपलब्ध नाही.

प्रवाशांचा हस्तक्षेप; मोठी दुर्घटना टळली

इस्रायलमधील वृत्त संकेतस्थळ वायनेट न्यूजने दिलेल्या वृत्तानुसार, सह-वैमानिकाने फ्लायदुबईचे विमान कोसळवण्याचा प्रयत्न केला होता, असा आरोप काही प्रवाशांनी केला आहे. एका प्रवाशाचा व्हिडीओ समोर आला असून तो म्हणतो, आमच्या विमानाचे अपहरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान आम्ही सह-वैमानिकाला ताब्यात घेतले असून विमान लँड करण्याची तयारी करत आहोत. जे कुणी आम्हाला ऐकत असतील त्यांनी कृपया आम्हाला मदत पाठवावी. आम्ही सौदी अरेबियात विमान उतरवत असून आम्हाला तिथली काही माहिती नाही. या प्रवाशाने पुढे म्हटले की, पायलट वगळता विमानातील सर्व प्रवासी सुखरूप आहेत. तसेच विमानातील आणखी एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. ज्यात मुख्य वैमानिक जखमी झालेला दिसत असून त्याच्यावर उपचार करण्याचा प्रयत्न प्रवासी करत आहेत.

दुबई ते सौदी अरेबिया, विमानात काय काय घडलं?

फ्लायदुबई FZ१०७३ या विमानाने दुबईहून सकाळी ६ वाजून ५ मिनिटांनी उड्डाण घेतले. सव्वा तीन तासांनी हे विमान तेल अवीवमध्ये उतरणे अपेक्षित होते. मात्र सकाळी ८ वाजून २१ मिनिटांनी तेल अवीवच्या जवळ पोहोचताच विमान वेगाने खाली आल्याचे जाणवले. ३० सेकंदांत विमानाची उंची १४ हजार फूटांनी कमी झाली. सकाळी ८:३१ वाजता विमानाने ७७०० हा इमर्जन्सी कोड प्रसारित केला. आंतरराष्ट्रीय पातळीवर आपत्कालीन परिस्थितीत हा कोड प्रसारित केला जातो.

### दुष्काळग्रस्त २६५ तालुक्यांतील

मध्ये होणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांसाठी दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांकडून शुल्क न घेता ऑनलाइन आवेदनपत्रे स्वीकारण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांना तातडीने सूचना - या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी सर्व विभागीय मंडळांनी आपल्या कार्यक्षेत्रातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना आवश्यक सूचना देण्याचे आदेश दिलेत. तसंच करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळाकडे तातडीने सादर करण्यासही सांगण्यात आलं आहे. दरम्यान, परीक्षा शुल्क माफीबाबतच्या पुढील सविस्तर सूचना राज्य मंडळाकडून स्वतंत्रपणे जारी करण्यात येणार आहेत. त्यामुळे दुष्काळग्रस्त भागातील दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा मिळणार असून, परीक्षा अर्ज भरताना शुल्काचा अतिरिक्त भार सहन करावा लागणार नाही.

मंत्रिमंडळ बैठकीत यासंदर्भात आधीच निर्णय घेण्यात आला होता. त्यावेळी यासंदर्भातील तपशील नंतर जाहीर करण्यात येणार असल्याचं सांगण्यातं आलं होतं. त्यानुसार या परीक्षा शुल्क माफीची घोषणा आज करण्यात आली.

### रोहितचं शतक, शुबमन

जवळ पोहोचला आहे. गिलने धावांचा पाठलाग करताना वनडे क्रिकेटमधील सर्वात वेगवान द्विशतक झळकावलं आहे. हे गिलच्या वनडे कारकिर्दीतील दुसरं द्विशतक आहे. यासह त्याच्या नावे आणखी एका खास विक्रमाची नोंद आहे. गिल हा वनडे क्रिकेटमध्ये धावांचा पाठलाग करताना सर्वात मोठी खेळी करणारा फलंदाज बनला आहे.

### नागपूरातील इसमाची निर्घृण हत्या

कारणाने केली यासह या घटनेचा पुढील तपास खल्लारचे ठाणेदार अमोल मुडे यांच्या मार्गदर्शनात खल्लार पोलिस करीत आहेत.

आरोपी पळून जाण्यात अपयशी-ज्या वेळी मृतकावर चाकूने हल्ला चालू होता. त्याचवेळी खल्लार पोलिस स्टेशनचे पोहेकॉ शेख नूर हे पोलिस स्टेशनला जात असतांना त्यांना विधीसंघर्षित बालके मृतकावर हल्ला करीत असल्याचे दिसले. त्यांनी लगेच दुचाकी थांबवून विधीसंघर्षित बालकांना पकडण्यासाठी त्यांच्या मागे धाव घेतली मात्र विधीसंघर्षित बालके नजरेआड झाले. तेवढयातच पोहेकॉ अमोल कथलकर आले. त्यांना घटनेबाबत माहिती मिळताच क्षणाचाही विलंब न लावता शेख नूर यांना सोबत घेऊन पळून जात असलेल्या विधीसंघर्षित बालकांना घटनास्थळापासून एक किमी अंतरवराव चंद्रपूर प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ पोहेकॉ वेंकेश नाकील यांच्या मदतीने पकडण्यात आले. दोन्ही विधीसंघर्षितांना ताब्यात घेण्यात आले आहे.

**खल्लारमधील हत्येची दुसरी घटना-** खल्लार गावाच्या इतिहासात १९६४ नंतरची हत्येची ही दुसरी घटना होय. १९६४ साली गावातीलच एका कुटुंबातील काकाने पुतण्याचा झोपेत असतांना कुऱ्हाडीने खून केला होता. आजच्या घटनेमुळे खल्लार गावात १९६४ च्या घटनेची पुनरावृत्ती झाली. दरम्यान मृतकावर विधीसंघर्षित बालकांनी हल्ला केल्यावर पळून जात असतांना हत्येसाठी वापरलेला चाकू हा चंद्रभागा नदीच्या पुलावरून नदी पात्रात फेकून दिला होता. तो चाकू पोलिसांनी जप्त करुन ताब्यात घेतला आहे. ज्या ठिकाणी ही निर्घृण हत्या करण्यात आली. त्या भागातील दुकानदारांनी त्यांची दुकाने लगेच बंद केली. नेहमीच गजबजणाऱ्या चौकात या निर्घृण हत्येने दुकाने बंद होती मात्र घटनास्थळी नागरिकांची गर्दी होती.

### पत्नी आणि मुलांना जिवंत

वाजता एक संशयित व्यक्ती घराजवळ येताना दिसत आहे. घरात अचानक आग लागल्याने महिला आणि तिच्या दोन मुलांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला होता. आगीतून बाहेर पडण्यासाठी त्यांना मोठी धडपड करावी लागली.या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलिसांनी तपास सुरू केला आहे. सर्व बाजूंनी पोलीस तपास करत आहेत. या प्रकरणातील संशयित अमोल गोळे हा घटनेनंतर फरार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्याचा शोध घेण्यासाठी राजापेठ पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत.

### फॉल्टी मीटरच्या नावाखाली

होत आहे. ग्राहकांनी या प्रकरणी मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करण्याची तयारी सुरू केली आहे.

**मुख्य कार्यालयाकडून बिल वाढवून-** मीटर फॉल्टी असलेल्या ग्राहकांच्या सरासरी वापरात वाढीव युनिटचे बिल येत असल्याने बिल दुरुस्तीला गेलेल्या ग्राहकांना आमच्या हातात काही नाही हे सर्व हेड ऑफिस मधून होत असल्याचे अधिकारी व कर्मचारी ग्राहकांना सांगत असून बिल दुरुस्त होत नसल्याने आपण स्मार्ट मीटर लावा तेव्हाच हे बिल दुरुस्त होईल असे वीज वितरण कंपनीचे कर्मचारी ग्राहकांना सांगत आहे. मीटर फॉल्टीच्या बिलात वाढ करणाऱ्या अधिकाऱ्याची शासनाने चौकशी करण्याची मागणी ग्राहक करीत आहेत.

### आमरण उपोषणाला बसलेल्या

आहे. प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका महिलेने घेतली आहे. यावेळी विनोद नरवरे आणि किशोर मोहोड यांनी पीडित महिलेला तात्काळ न्याय मिळावा, तिच्या तक्रारीची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी आणि आरोपांची सत्यता तपासून दोषींवर कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी केली. उर्वरित पाच व्यक्तींविरुद्धही तक्रारीनुसार कायदेशीर प्रक्रिया राबविण्याची मागणी त्यांनी केली. या गंभीर आरोपांची प्रशासनाकडून निष्पक्ष चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणावी, पीडित महिलेच्या तक्रारीवर कायद्यानुसार कार्यवाही करावी आणि तिच्या प्रकृतीचीही तातडीने काळजी घ्यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन पुढे कोणती भूमिका घेते, याकडे अचलपूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### कोयत्यासह फिरणारा

आयुक्त राकेश ओला आणि डीसीपी यशवंत सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली एजीएसचे पीएसआय मिलिंद हिवरे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. पथकातील पोलिस कर्मचाऱ्यांनी कारवाईत सहभाग घेतला.

### दुसऱ्या दिवशी ४० नामांकनाची

यांनी नामांकन उचलले आहे. शिक्षक मतदार संघासाठी निवडणूक येत्या २३ ऑक्टोबर रोजी होणार आहे. यावेळीही अमरावती शिक्षक मतदारसंघात चांगलीच लढत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### अवैध दारू विक्रीसह अमली पदार्थ

करीत असल्याच्या आरोपावरून अब्दुल जब्बार अब्दुल खालीद (४७, रा. पठाण चौक) याच्याविरुद्धही कारवाई करण्यात आली. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर व दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात पथकाने ही कारवाई केली.

### अतिक्रमण कारवाई दरम्यान भिंत

असून, त्यांना पुढील उपचारासाठी अमरावतीला पाठविण्यात आले आहे.तर गोपाल घाटे आणि नंदूवर पण उपचार सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळासाठी खळबळ उडाली होती.

### बकऱ्या चोरीचा गुन्हा उघडकीस

अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी गिरीश तातेड यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक तथा ठाणेदार संजय आत्राम, पोलीस उपनिरीक्षक महादेव पोकळे, पोलीस हेड कॉन्स्टेबल अरुण पवार, पोलीस हेड कॉन्स्टेबल अमरदीप वाघमारे व पोलीस कॉन्स्टेबल अविनाश राठोड यांनी केली.

### शहरात १५ दिवस निर्बंध

कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. रस्त्यावरून जाणाऱ्या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी कसे वागावे, मिरवणुका कोणत्या मार्गाने व कोणत्या वेळी काढाव्यात, याचे अधिकार पोलिसांना राहतील. कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्यावर गाणी गाणे, ढोल-ताशे व इतर कर्कश वाद्ये वाजविण्यावर पोलिसांचे नियंत्रण असेल. इतर कोणत्याही व्यक्तीने या आदेशाचे उल्लंघन केल्यास, तो महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३४ प्रमाणे कायदेशीर कारवाईस पात्र राहील, असे या आदेशात सांगण्यात आले आहे.

### सहा जणांवर संघटित गुन्हेगारीचे

बारसे आणि आकाश ऊर्फ आक्या सुरेश धुर्वे (वय १९) यांचा समावेश आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, अक्षय जुनघरे याच्याविरुद्ध मागील दहा वर्षांत अमरावती शहर व जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांत दहा गुन्हे दाखल आहेत. चोरी, घरफोडी, दरोडा, खुनाचा प्रयत्न आणि अवैध शस्त्र बाळगण्यासह विविध प्रकरणांमध्ये त्याचा सहभाग असल्याचे पोलिसांनी सांगितले. घरफोडीच्या गुन्ह्याच्या तपासात या सहा जणांचे कनेक्शन समोर आल्यानंतर कलम ११२ वाढविण्यात आले. या कलमामुळे प्रकरणाला अधिक गंभीर स्वरूप प्राप्त झाले आहे. पुढील तपास परतवाडा पोलिसांकडून सुरू आहे. ही कारवाई ग्रामीण पोलिस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलिस अधीक्षक दत्ता तोटेवाड, सहायक पोलिस अधीक्षक ईशानी आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांवर

'ही विमा पॉलिसी तुमच्या भविष्यासाठी खूप फायदेशीर आहे, कर्जातील काही रक्कम या पॉलिसीमध्ये गुंतवा,' असे सांगून बँक अधिकाऱ्यांनी पॉलिसी काढण्यासाठी सक्ती सुरू केली.असाच एक मनस्ताप धनेगाव येथील वयोवृद्ध शेतकरी शिवदास पंढरी येवले यांना सहन करावा लागला. त्यांच्यासाठी त्यांचे पुत्र राहुल येवले यांना अचलपूर येथून तातडीने अंजनगाव सुर्जी गाठावे लागले. बँकेत आल्यावर केवळ पॉलिसी विकण्यासाठी बोलावल्याचे समजताच राहुल येवले यांनी आक्षेप घेतला. 'ही माहिती तुम्ही फोनवर दिली असती तरी चालले असते, एवढ्या तातडीने बोलावून तुम्ही फक्त पॉलिसी काढायला सांगत आहात, आम्हालाही इतर कामे असतात,' असे त्यांनी बँक अधिकाऱ्यांना सुनावले. यावर बँक अधिकाऱ्यांनी कोणतीही सहानुभूती न दाखवता, 'आमचे कर्तव्य आहे तुम्हाला पॉलिसी सांगायचे, तुमचे काम आहे ऐकायचे,' अशा अत्यंत उद्धट आणि अरेरावीच्या भाषेत उत्तर दिल्याचा आरोप राहुल येवले यांनी केला आहे.सध्या दुष्काळामुळे शेतकरी हवालदिल झाला असून त्याला पिकांची चिंता सतावत आहे. अशा संवेदनशील परिस्थितीत बँक अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांविषयी कोणतीही सहानुभूती नसून, केवळ स्वतःचे 'टार्गेट' पूर्ण करण्यासाठी आणि बँकेचा व्यवसाय वाढवण्यासाठी शेतकऱ्यांवर दबाव आणला जात आहे. या दबावाला बळी पडून अनेक निरक्षर व गरजू शेतकरी आपल्या हक्काच्या कर्जातील रक्कम पॉलिसीमध्ये गमावण्याची भीती व्यक्त होत आहे. या प्रकरणाची वरिष्ठ बँक प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन चौकशी करावी आणि दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी अमरावती जिल्ह्यातील शेतकरी वर्गातून अत्यंत तीव्रतेने केली जात आहे.

**नियम काय सांगतो?** रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (RBI) च्या नियमांनुसार, कोणत्याही कर्जासोबत बँक ग्राहकाला इतर कोणतीही विमा पॉलिसी किंवा गुंतवणूक उत्पादन खरेदी करण्यासाठी सक्ती करू शकत नाही. पीक कर्ज घेताना सुरक्षा विमा किंवा इतर पॉलिसी पूर्णपणे ऐच्छिक असतात. मात्र, अंजनगाव सुर्जी शाखेत या नियमांना केराची टोपली दाखवली जात असल्याचे चित्र आहे.

कोणत्याही शेतकऱ्यांना आमच्या बँक शाखेकडून पॉलेसी काढण्यासाठी दबाव टाकला जात नाही. शेतकऱ्यांना सन्मानपूर्वक वागणूक दिली जाते असा प्रकार आमच्या बँक शाखेकडून कधीही घडला नाही.

**-सचिन कसबे,एसबीआय शाखा व्यवस्थापक, अंजनगाव सुर्जी-** अंजनगाव सुर्जी एस बी आय शाखेतून आम्हाला फोनवर अर्जंट बँक शाखेत आधार कार्ड घेऊन असे म्हणून बोलावले होते. मी अचलपूर येथून तर माझे वडील धनेगाव येथून बँकेच्या शाखेत आलो. तिथे गेल्यावर आम्हाला तुमचे कर्ज मंजूर झाले असून तुम्हाला पॉलेसी काढायची आहे ही खुप फायदेशीर आहे असे सांगणे सुरू केले. त्यावर मी म्हणालो हे तुम्ही फोनवर सुद्धा सांगू शकले असते त्यावर बँक अधिका-यांनी माझ्यासोबत गैरवर्तणूक भाषेत वर्तन केले. आम्ही सर्वांना पॉलेसी बाबत फोनवर सांगत नाही. असे उर्मटपणे बँक अधिकारी बोलत होते. याबाबत मी तहसीलदार यांच्या कडे तक्रार देणार आहे.

**राहुल शिवदासराव येवले, तक्रारदार शेतकरी -धनेगाव**

### जिल्ह्यातून चारा बाहेर

वैरण (निर्यात नियंत्रक) आदेश २००१' मधील तरतुदींचा वापर करून ही वाहतूक बंदी घालण्यात आली आहे.

हा आदेश २९ सप्टेंबर २०२६ पासून पुढील पुढील आदेश येईपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात लागू राहील. या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश पोलीस प्रशासन, महसूल विभाग, प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आले आहेत.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१८८१/२०२६**
**Shila Rajbhoj Dupare+2 Versus NIL**
**पुढील ता.२३.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants**

1. **Shila Rajbhoj Dupare,** Aged 49 yrs. Occ.- Household R/o. House No. 4759. Sambodhi Colony, Near S.A. Imperial, D.P. Road Rahatgaon, Shivaji Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati
2. **Anushree Rajbhoj Dupare,** Aged 22 yrs. Occ.- Education
3. **Anjali Rajbhoj Dupare,** Aged 17 yrs. Occ.- Education
2 and 3 R/o. Shrihari Nagar, Arjun Nagar, Shivaji Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati

--Versus--

Non-Applicant - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत deceased Rajbhoj Pundlik Dupare** हे दिनांक ०५.१२.२०२४ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **Shila Rajbhoj Dupare +2 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Shila Rajbhoj Dupare +2 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०९.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.४६८/२०२६ ने.ता.०५.११.२०२६

अर्जदार :
१. **इंदूबाई तुकारामजी केकाडे,** वय ७९ वर्षे, व्यवसाय-घरकाम
२. **जिवन तुकारामजी केकाडे,** वय ३९ वर्षे, व्यवसाय-मजूरी
३. **सुनिल तुकारामजी केकाडे,** वय ३७ वर्षे, व्यवसाय - मजूरी
४. **वंदना सुनिल सातपुते,** वय ४३ वर्षे, व्यवसाय- घरकाम
५. **रंजना मारोती कावरे,** वय ४० वर्षे, व्यवसाय- घरकाम
अर्जदार क्र.१ ते ३ रा.तेलीपुरा, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार क्र.४ रा.तेलीपुरा, हरम, ता.अचलपूर, जि.अमरावती
अर्जदार क्र.५ रा.सातेबाव, ता.अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक तुकाराम पुंजाजी केकाडे** यांचा **मृत्यू दि.१९/०९/२०१८** रोजी रा.खेल चौधर करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४६८/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि.३०.०९.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

---

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फौजदारी न्यायालय, कोर्ट क्र.०२, चांदूर बाजार यांचे न्यायालयात**

**पोलीस स्टेशन चांदूर बाजार**
**एल.सी.सी.१३०/२०१८**
**कलम १३८ एन आय ॲक्ट**
**पुढील ता.१२.१०.२०२६**

**प्रति,**
पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन चांदूर बाजार,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**जाहीर प्रगटन (अधिसूचना)**
**कलम ८४ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता प्रमाणे**

ज्याअर्थी माझे समक्ष **पोलीस स्टेशन चांदूर बाजार यांनी एस.सी.सी. १३०/२०१८, प्रमाणे आरोपी नामे रणजीत रावसाहेब राऊत, ४२ वर्षे, रा.राउतपुरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** यांनी गुन्हा केल्याबाबतचे प्रकरण हया न्यायालयात दाखल केले आहे. सदर आरोपी हे सापडू शकत नाही. तसेच माझ्या असे निदर्शनास आणुन देण्यात आले आहे की, सदर आरोपी हे फरार आहे किंवा आरोपी वारंट तामील पासून स्वतःला लपवित आहे.

करिता जाहीर प्रगटन अधिसुचना देण्यात येते की, सदर **आरोपी नामे रणजीत रावसाहेब राउत, ४२ वर्ष, रा. राउतपुरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** हयाने चांदूर बाजार येथील वि.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोर्ट क्र.०२ हयांचे न्यायालयात **दिनांक १२/१०/२०२६** रोजी आपली बाजु मांडण्याकरिता न चुकता हजर राहावे.

आज **दिनांक २७/०७/२०२६** रोजी माझे माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**सही/-**
**(एम.एम.राऊत)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोर्ट क्र.०२, चांदूर बाजार**

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## बाजारातील घसरण

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विविध निर्णयांचे गेल्या पावणे दोन वर्षांमध्ये भारतीय शेअर बाजारात अत्यंत प्रतिकूल पडसाद उमटलेत. १०० ते ५०० टक्के टॅरिफचा निर्णय, कधी ग्रीनलँड, पनामा कालवा कब्जात घेण्याची धमकी किंवा इराण युद्धातील वक्तव्ये, त्यांनी केलेल्या विधानांमुळे शेअर बाजारात तीव्र चढउतार दिसून आले. कमोडिटी मार्केटमध्ये म्हणजेच कच्चे तेल, सोने, चांदी, धातूंच्या बाजारातही हीच स्थिती दिसून आली. ट्रम्प हे बाजारांची दिशा जाणीवपूर्वक बदलण्यासाठी विशिष्ट स्थिती पाहून वक्तव्ये करतात, अशी कुजबुजही गुंतवणूकदारांमध्ये असते. या चर्चा पूर्णतः निरर्थक आहेत, असे छातीठोकपणे म्हणता येत नाही; पण काळजीचा मुद्दा तो नसून बाजारातील घसरणीमुळे गुंतवणूकदारांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे वातावरण हा आहे. गतसप्ताहातील घसरणीने राष्ट्रीय बाजाराच्या निर्देशांकाने (निफ्टी) सलग सात आठवडे घसरणीची मालिका पूर्ण केली. कोरोना महामारीनंतरची ही सर्वाधिक काळ चाललेली साप्ताहिक घसरण ठरली. प्रदीर्घ घसरणीनंतर बाजार सावरतो, असे आजवरचे चित्र सांगते; पण चालू आठवड्याची सुरुवात जोरदार घसरणीने झाल्याने गुंतवणूकदारांचा भ्रमनिरास झाला. सलग होणारी घसरण काही वेळा मंदीचे संकेत देते. कोरोना काळातील घसरणीनंतर सुरू झालेली तेजी एवढी मोठी होती की, पाच वर्षांमध्ये निफ्टीमध्ये १५ ते १७ हजार अंकांची वाढ पाहायला मिळाली. या कालावधीतील वार्षिक चक्रवाढ परतावा सुमारे २३ टक्के होता; पण गेल्या दोन वर्षांत महाग मूल्यांकन, कंपन्यांच्या नफ्यात अपेक्षेपेक्षा कमी झालेली वाढ, परकीय निधीचा उलटा प्रवाह, आयटी क्षेत्रातील व्यवसायाचे बदलते गणित, कच्च्या तेलाची उसळी, वाढते जागतिक रोखे उत्पन्न आणि रुपयाची घसरण हे सर्व प्रवाह टप्प्याटप्प्याने बाजारावर प्रतिकूल प्रभाव टाकत होते. आज ते सर्व एकाच बिंदूवर आल्यामुळे गुंतवणूकदारांसाठी ग्रहणस्थिती निर्माण झाली आहे. 'निफ्टी-५०'ने २६ सप्टेंबर २०२४ रोजी २६ हजार २१६ चा तत्कालीन ऐतिहासिक उच्चांक गाठला तेव्हा या प्रवासाचे पहिले टोक दिसले. त्यानंतर ऑक्टोबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या काळात व्यापारविषयक अनिश्चितता, भूराजकीय तणाव, मंदीची भीती, कंपन्यांच्या नफ्यातील घट आणि महाग मूल्यांकन यामुळे बाजारात मोठी पडझड झाली. एनएसईवरील कंपन्यांचे एकूण बाजारमूल्य रुपयांत १९.५ टक्क्यांनी आणि डॉलरमध्ये २३ टक्क्यांनी घटले; मात्र बाजार पुन्हा सावरला आणि गतवर्षी निफ्टीने १०.५ टक्के परतावा दिला. त्यामागे देशांतर्गत संस्थात्मक गुंतवणूक, जीएसटीतील बदल, तुलनेने अनुकूल पतधोरण आणि भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीवरील विश्वास हे घटक होते. तथापि, या तेजीची रचना आधीपेक्षा वेगळी होती. परकीय गुंतवणूकदारांचा विक्रीचा मारा सुरूच होता; पण देशांतर्गत पैसा त्यांच्या विक्रीचा भार उचलत होता. या आधारावर चालू वर्षाच्या सुरुवातीला बाजाराने नवा उच्चांक प्रस्थापित केला; पण आजचे चित्र उलट आहे. निफ्टी ऐतिहासिक उच्चांकापेक्षा सुमारे १४ टक्के खाली आहे. गेल्या २५ वर्षांत निफ्टीने सात वेळा सलग साप्ताहिक घसरण केवळ चार वेळा अनुभवली. २००१ मधील ९ आठवड्यांची घसरण सर्वांत मोठी होती. त्यामुळे सध्याची पडझड २००८सारख्या जागतिक आर्थिक संकटाकडे इशारा करणारी नाही ना, असा प्रश्न पडला आहे. होर्मुझचे संकट आणि राष्ट्राराष्ट्रांत संघर्ष चिघळू लागल्याने चालू वर्षाखेरीस जगाला अल्पकालीन, छोट्या मंदीचा सामना करावा लागेल अशी भीती तज्ज्ञांकडून व्यक्त होत होती. भारतासाठी जोड म्हणजे भीषण दुष्काळाचे संकट आणि त्याचा कृषी उत्पन्नासह औद्योगिक मागणीपर्यंत होणारा परिणाम. त्याच्या कचाट्यातून बचाव होणार नाही, हे स्पष्ट आहे. क्रूड ऑईलचे भाव १०० डॉलरच्या पुढे जाणे अर्थव्यवस्थांसाठी मारक ठरते. कारण, आयातीवरील खर्च व व्यापारतूट वाढून रुपयावर दबाव येतो. वाहतूक खर्च वाढतो. महागाई वाढते. परिणामी, रिझर्व्ह बँकेला व्याजदरात वाढ करावी लागते. यामुळे कर्जे महाग होऊन उद्योगांची गुंतवणूक आणि ग्राहकांची मागणी प्रभावित होते. कंपन्यांच्या नफ्यावरही प्रतिकूल परिणाम होतो. अशा स्थितीत गुंतवणूकदार नफावसुलीला प्राधान्य देतात.सध्याच्या घसरणीचे एक प्रमुख कारण म्हणजे, अमेरिकेतील सरकारी रोख्यांचे वाढलेले उत्पन्न. अमेरिकेच्या १० वर्षांच्या ट्रेझरी रोख्यांचे उत्पन्न ५.२७ टक्क्यांच्या पुढे जाऊन १९ वर्षांच्या उच्चांकावर पोहोचले. दोन वर्षांच्या रोख्यांचे उत्पन्नही पाच टक्क्यांजवळ आहे. पुढील वर्षी अमेरिकन फेडकडून आणखी दरवाढीची शक्यता बळावली आहे. बाँडयिल्ड वाढल्यास भारतासारख्या उदयोन्मुख बाजारात अधिक जोखीम घेण्यासाठी गुंतवणूकदारांना त्यापेक्षा जास्त संभाव्य परतावा हवा असतो; पण रुपयात घसरणीमुळे डॉलरमध्ये मिळणारा परतावा कमी होतो. याला 'रिस्क प्रीमियम'चे गणित म्हणतात. सरकारी रोखे उत्पन्न हे कॉर्पोरेट कर्जासाठी संदर्भदराचे काम करतात. त्यात वाढ झाल्यास कंपन्यांना नवीन कर्ज उभारणे महाग पडते. त्याचेच पडसाद दलाल स्ट्रीटवर उमटले. भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे. शेअर बाजारातील देशांतर्गत गुंतवणूक सातत्याने वाढत आहे, तरी विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार भारतीय बाजारामधून पैसे काढून घेत आहेत, त्यामागे हेच कारण आहे. सप्टेंबर २०२४ पर्यंतच्या २४ महिन्यांत विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात ३८.६ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली होती. तथापि, त्यानंतरच्या २४ महिन्यांत त्यांनी अंदाजे ५६.३ अब्ज डॉलर्स काढून घेतले. सततच्या पडझडीमुळे अनेक समभागांचे मूल्य आकर्षक पातळीवर आले असले, तरी आता जागतिक परिस्थिती नकारात्मक आहे. देशांतर्गत म्युच्युअल फंड, विमा कंपन्या आणि एसआयपीच्या पैशाने बाजारातील घसरण दीर्घकाळ रोखून धरली; पण त्यांची क्षमताही अमर्याद नाही. फेब्रुवारीअखेरीस इक्विटी म्युच्युअल फंडांकडील रोख साठा एप्रिल २०२५ च्या तुलनेत ४ टक्क्यांनी कमी होऊन १.७८ लाख कोटी रुपयांवर आला. एआयची प्रगती आणि अमेरिकेच्या बदलत्या धोरणांमुळे आयटी कंपन्यांच्या समभागांतही मोठी घसरण झाली. एचडीएफसी बँक, टाटा उद्योगसमूह यांच्या समभागांचे भाव अंतर्गत घडामोडींमुळे घसरलेत. 'इर्डा'चा नवा प्रस्ताव विमा कंपन्या आणि बँकिंग क्षेत्रातील समभागांमधील पडझडीचे तात्कालिक कारण ठरला आहे. जानेवारी ते सप्टेंबर या काळात निर्देशांकात १४ टक्क्यांची घसरण झाली. युद्ध टळले, कच्च्या तेलाच्या किमती पुन्हा ७०-८० डॉलर प्रतिबॅरेलवर आल्या की, कंपन्यांच्या नफ्यात पुन्हा वाढ दिसू लागेल आणि परिस्थिती बदलेल. 'एसआयपी'तून आणि दीर्घकालीन उद्दिष्ट ठेवून गुंतवणूक करणाऱ्यांनी या पडझडीमुळे घाबरून जाण्याचे कारण नाही; पण जागतिक पटलावरची अनिश्चितता लवकरात लवकर दूर होणे नितांत गरजेचे आहे.

# कोरडा दुष्काळ, घोषणाही कोरड्याच!

**दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, त्यांना सर्वतोपरी मदत करणार, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे. दुष्काळाचे पाहणी दौरेही त्यांनी सुरू केले आहेत. मुळात यंदा राज्यात भीषण दुष्काळ पडणार हे आधीपासूनच माहिती असताना या घोषणा, उपाययोजनांसाठी सप्टेंबर अखेरपर्यंत थांबण्याची काय गरज होती? शेतकऱ्यांसाठीच्या सरकारी घोषणा कोरड्या दुष्काळाप्रमाणे कोरड्याच ठरतात, हा नेहमीचा अनुभव या वर्षी तरी येऊ नये!**



यंदाच्या मान्सूनवर एल निनो, सुपर एल निनोचे सावट राहणार आणि त्यामुळे भारताला इतिहासातील सर्वांत भीषण दुष्काळाचा सामना करावा लागेल, असे अंदाज जगभरातील हवामान संस्थांकडून एप्रिल महिन्याच्या आधीपासूनच वर्तवले जात होते. आयएमडी आणि स्कायमेट या संस्थांनीही सरासरीच्या ९१ टक्के मान्सून पडेल असे अनुमान वर्तवले होते. त्यानुसार यंदा मान्सूनचे आगमनही लांबले. त्यानंतर सुरुवातीला पडलेला खंड, नंतर झालेले असमान वितरण व ऑगस्ट महिन्यापासून पावसाने मारलेली दडी यामुळे महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेषत मराठवाडा आणि विदर्भात दुष्काळाची तीव्रता उर्वरित महाराष्ट्राच्या प्रमाणात अधिक आहे.

१ जून ते २० सप्टेंबर या कालावधीत मराठवाड्यात सरासरीच्या तुलनेत सुमारे ३५ टक्के, तर विदर्भात सुमारे ३० टक्के पर्जन्यतूट नोंदविण्यात आली आहे. या कालावधीत राज्यातील सरासरी पर्जन्यतूट १५ टक्के आहे. यावरून राज्यभराचे पावसाचे चित्र एकसमान नाही हे स्पष्टपणाने दिसून येते. मराठवाड्यात परभणी जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यातील पावसाची तूट तब्बल ४५ टक्के आहे. गेल्या आठवड्यात १३ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली असली तरी पिके हातची गेल्यानंतर हा पाऊस झाल्याने त्याचा शेतकऱ्यांना कोणताच दिलासा मिळाला नाही.

अपुऱ्या पावसामुळे राज्यातील धरणांतील पाणीसाठा आटला आहे. सर्वांत मोठा फटका या भागातील शेतीक्षेत्राला बसला आहे. या भीषण परिस्थितीचे दर्शन मुख्यमंत्र्यांनी नुकत्याच केलेल्या दौऱ्यादरम्यान पाहायला मिळाले आहे. राज्याचे प्रमुख या नात्याने त्यांनी पाहणीदौऱ्याची आखणी केली हे बरेच झाले. यादरम्यान करपलेले पीक, भेगाळलेली जमीन, आटलेली विहीर, वाया गेलेले खरीपाचे पीक या सर्वांबाबत आमच्या शेतकरी बांधवांनी अश्रू गाळून आपली आपबिती त्यांच्यासमोर मांडली. मुख्यमंत्र्यांनी सर्वतोपरी मदत करू, लवकरात लवकर दुष्काळ जाहीर करू असे आश्वासनही दिले. शेतकऱ्यांनी कर्जे घेऊन शेती उभी केली हेही त्यांनी मान्य केले; पण मुख्यमंत्र्यांनी त्या शेतकऱ्यांना पेरणीपासून सोयाबीनमध्ये दाणे भरण्यापर्यंतचा प्रत्यक्ष खर्च किती झाला आहे, हे सर्वांसमोर का नाही विचारले? ते आकडे सांगून शेतकऱ्यांनी हा खर्च खासगी कर्जातून केला असल्याने आता एनडीआरएफच्या निकषांच्या मर्यादेत न राहता सर्व खर्च सरकार भरून देईल अशी व्यवस्था आम्ही करू, असे आश्वासन का दिले नाही? कारण एनडीआरएफचे निकष सहा-सात वर्षांपूर्वी ठरवले गेले आहेत. या कालावधीत शेतीच्या उत्पादनखर्चापासून शेतकऱ्याच्या जगण्यासाठीचा खर्च जवळपास दुप्पट झालेला आहे. मुळातच या अधिक खर्चाच्या व्यवस्थेमध्ये शेतकऱ्याची जोखीम वाढते आहे. सरकारी पक्षांचे प्रवक्ते किसान सन्मान निधीसह अन्य उपाययोजनांचा दाखला देऊन मागील सरकारांशी तुलना करत आपली पाठ थोपटून घेत असले तरी ती दिशाभूल आहे.

### रब्बीची पेरणीच नाही!

सद्यस्थितीत रब्बीची पेरणी मराठवाडा-विदर्भात होणार नाही हे स्पष्ट झालेले आहे. मग यामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई सरकार कशी देणार आहे? उदाहरणार्थ, मला गतवर्षी सोयाबीनचे पीक एकरी दीड-दोन क्विंटलही मिळाले नाही. जे पीक हाताशी आले ते मी ४००० रुपये प्रति क्विंटल दराने विकले. त्यातून माझा उत्पादनखर्चही निघाला नाही. त्यातून धडा घेत मी रब्बीमध्ये हरभरा पेरला. एकरी सात क्विंटल हरभरा मिळाला आणि एका एकरातील हरभरा ४० हजार रुपये दराने विकला. दहा एकरातील हरभऱ्यातून सुमारे ४ लाख रुपये मिळाले; पण यंदा रब्बीची पेरणीच होणार नसल्याने माझी वार्षिक कमाई आटणार आहे. याची भरपाई या अधिक खर्चाच्या व्यवस्थेत कशी मिळणार आहे?

### रुपयाचे मूल्य

शेतकऱ्यांना मिळणारी सरकारी मदत रुपयांमध्ये मदत जास्त दिसत असली तरी रुपयाचे मूल्य बदलले आहे. त्यामुळे १९७२ च्या दुष्काळात दिलेल्या एक हजार रुपयांची तुलना आताच्या २० हजार रुपयांशी करणे हे तर्कसंगत आहे का? पीएम किसान सन्मान निधी अंतर्गत २०१९ मध्ये सहा हजार रुपये वर्षाकाठी दिले जात होते. आज सात वर्षांनंतरही यामध्ये वाढ झालेली नाही. या काळात मुख्यमंत्री-पंतप्रधान यांच्या कार्यालयाचा खर्च वाढला नाही का? त्यांच्या वाहनांवरील चालकाचे वेतन वाढले नाही का? मग तेवढ्या प्रमाणात शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या निधीत वाढ का केली नाही? तसेच एनडीआरएफच्या निकषांनुसार ठरवण्यात येणाऱ्या प्रति हेक्टरी मदतीमध्येही वाढ केली पाहिजे; अन्यथा त्या मदतीला अर्थच उरणार नाही.

### कवडीमोल भाव

दुसरी गोष्ट म्हणजे पावसाची तूट वाढत चालली आहे हे आधीपासूनच माहीत असताना ऑक्टोबर महिना उजाडेपर्यंत थांबण्याची गरजच नव्हती. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे शेतकरी त्रस्त झाला होता. तेव्हा त्याला कसलीही मदत केली गेली नाही. आज तोच शेतकरी 'माझ्या शेतातून एक किलो सोयाबीन काढून दाखवा, मी एक क्विंटल बदाम देतो' असे म्हणत आहे. इतके विदारक चित्र असताना केवळ तुमच्या पाठीशी उभे राहतो असे म्हणून कसे चालेल? तिसरी गोष्ट म्हणजे हवामान बदलांविषयी बरेच बोलले जाते. आम्हीही शेतकरी संघटनेच्या माध्यमातून पूर्वीपासून अस्मानी संकट आणि सुलतानी संकट याविषयी बोलतो आहोत. हवामान बदलांमुळे अस्मानी संकटाची तीव्रता वाढत चालली आहे; तर सुलतानी संकट म्हणजे बाजारात पिकवलेल्या शेतमालाला चांगला भाव मिळत नाही. गेल्या वर्षी उत्पादन चांगले येऊनही शेतकऱ्याला ७००० रुपयांनाच कापूस विकावा लागला. नंतरच्या काळात तो साडे आठ-नऊ हजारांवर गेला. सोयाबीनही सुरुवातीला चार हजारांनाच विकावे लागले. नंतर ते ७ हजार झाले. म्हणजे शेतमाल पिकतो तेव्हा चांगला भाव मिळू द्यायचा नाही आणि नापिकीच्या काळात जास्तीचा भाव द्यायला लागतो म्हणून आयात करायची, अशा प्रकारच्या व्यवस्थेत शेती फायद्याची कशी होईल? शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम कसा होईल? आजच सरकारने खाद्यतेलावरील आयात कर १० टक्क्यांवरून पाच टक्के करण्याची घोषणा केली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शेतकऱ्याच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्याची जबाबदारी सरकारला कशी टाळता येईल? त्यामुळे मी नेहमी म्हणतो की, 'चांगले पीक, चांगले भाव, तरच गावात उरणार नाही गरिबीला वाव.'

आज सर्व राजकीय नेते पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर आहे, जनावरांच्या चाऱ्याचा, रोजगाराचा प्रश्न बिकट होणार आहे हे मान्य करताहेत. या भेदक परिस्थितीचा सामना केवळ पाणी अडवा, पाणी जिरवा या घोषणेने होऊ शकत नाही. विदर्भ आणि मराठवाड्यातील ७० टक्के शेतजमीन ही पावसाच्या पाण्यावरच अवलंबून आहे. जोपर्यंत या शेतकऱ्यांना पाण्याची व्यवस्था करून दिली जात नाही तोपर्यंत इथला शेतकरी निसर्गाशीही झगडणार आहे आणि बाजाराच्या अनिश्चिततेशीही भांडणार आहे. आजच्या एल निनो आणि सुपर एल निनोच्या पार्श्वभूमीवर या कोरडवाहू शेतकऱ्यांना एकरी सरसकट अनुदान किंवा मदत देण्याचे धोरण ठरवण्याची वेळ आली आहे.

अनेक कृषी वैज्ञानिक, कृषी विचारवंत क्रॉप पॅटर्न बदलण्याचा सल्ला देताहेत. पंतप्रधानांनी मिलेट धोरण जाहीर केले आहे. पण विदर्भ-मराठवाड्यातील ज्वारी-बाजरीचे पीक पूर्णपणे खराब झाले आहे. अशा स्थितीत महाराष्ट्र सरकार ज्वारी-बाजरी पुरवणाऱ्या शेतकऱ्यांना पुढच्या खरीपापासून पेरणी ते कापणीपर्यंतचे काम रोजगार हमी योजनेतून करून देण्याची घोषणा करणार आहे का? तशी घोषणा केल्यास सरकारने एल निनो-सुपर एलनिनोपासून धडा शिकला आहे असे म्हणता येईल.

या सगळ्याचा गांभीर्याने विचार करून शेतीचे नियोजन करणारी व्यवस्था तयार करण्याची गरज आहे. केवळ मराठवाडा दुष्काळमुक्त करू या घोषणांनी काहीही होणार नाही. अधिक खर्चाच्या व्यवस्थेत, अस्मानी-सुलतानी संकटांचा सामना करणाऱ्या शेतीला सरकारी तिजोरीतील मदत दिल्याशिवाय हा अन्नदाता शेतकरी जिवंत राहू शकत नाही. आपण अमेरिका, युरोप, इस्रायलची उदाहरणे, ठिबक सिंचनाची चर्चा वारंवार ऐकतो; पण तिथल्या शेतकऱ्याना तिथले सरकार कोणकोणती आणि किती मदत देते याची चर्चा या देशात होऊ दिली जात नाही.

अमेरिकेत दहा हजार एकर शेती असणारा शेतकरीही सरकारी मदतीशिवाय जगत नाही हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. भारत सरकारने खाद्यतेलावरील आयात कर पाच टक्क्यांनी कमी केला. पण अमेरिकेने गेल्या १५ दिवसांत कापसाचे भाव दहा टक्क्यांनी पाडले आहेत. १ डॉलर प्रति पौंड रुईचा भाव ९० सेंट प्रति पाऊंडवर आला आहे. भारतात ९५०० रुपये प्रतिक्विंटल दराने पंजाब व हरियाणामध्ये कापसाची खरेदी होत होती, तेथे हा भाव ८७५० रुपये प्रतिक्विंटलवर म्हणजेच एमएसपीपेक्षा कमी आलेला आहे. अशा पद्धतीने जागतिक बाजारातील मंदीमुळे भारतातील भाव पडणार असतील आणि केंद्र सरकार आयात कर कमी करून भाव पाडणार असेल तर शेतकऱ्यांनी दुष्काळाच्या संकटाला तोंड कसे द्यायचे?

नुकतीच हिंगोलीमध्ये दीड एकर सोयाबीनची शेती असणाऱ्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. दीड एकराच्या शेतीवर संपूर्ण कुटुंब आजच्या महागाईच्या काळात चालवता येणे शक्य नाही. त्यामुळे तो कुठे ना कुठे दुसरीकडे काम करत असणार हे उघड आहे. मृत्यूनंतर त्याच्या मुलीने केलेले विधान अत्यंत महत्त्वाचे आहे. ती म्हणाली, जी वेळ माझ्या वडिलांवर आली ती दुसऱ्या शेतकऱ्यांवर येऊ देऊ नका! अशा अनेक घटना आजवर घडलेल्या आहेत. सत्ताधारी पक्ष त्या कधी गांभीर्याने घेणार, हा कळीचा प्रश्न आहे.

**विजय जावंधिया**
**(लेखक ज्येष्ठ शेतकरी नेते, कृषीतज्ज्ञ आहेत)**

# संवाद

## निवडणूक व्यवस्थेवरील विश्वास गमावत आहोत?

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या कार्यपद्धतीवर शंका उपस्थित करुन हल्लाबोल केला जात आह. देशातील निवडणुका ठरवून अर्थात फिक्सिंग करुन घेतल्या गेल्या असल्याचे देशाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिल्लीतील कॉंग्रेस कार्यकारिणी कमिटीच्या सीडब्ल्यूसी बैठकीत स्पष्ट करुन ज्ञानेशकुमारांच्या निलंबनाची मागणी केला. रस्त्यावर, संसदेत संघर्ष सुरु ठेवण्याचा पक्का निर्धार केला आहे. त्यामुळे भारतीय निवडणूक व्यवस्थेवरील विश्वास गमावल्याचे स्पष्ट होत आहे. ईव्हीएम, मतदार याद्या, राजकीय नेतेमंडळींच्या पक्षांतर कोलांटउड्या, पैसेवाटप यासारख्या प्रकारामुळे राजकारण ढवळून निघाले असून एकूणच राजकारणाची कूस बदलली आहे.मतदारराजा आपल्या भागातील, मतदार संघातील समस्यांची सोडवणूक व्हावी म्हणून लोकप्रतिनिधींना निवडून देतो. मात्र देशांमध्ये जर का 'फिक्सिंग' करुन निवडणुका घेतल्या जात असतील तर कशाला पाहिजेत निवडणुका?

**राजू जाधव**

## विदारक अवस्था

जागतिक आरोग्य संघटना आणि युनिसेफ यांच्या संयुक्त देखरेख कार्यक्रमात एक शाळेविषयी अहवाल प्रसिद्ध झाला आहे . त्या नुसार जगातील विना स्वच्छतागृहा शिवाय काही देशातील मुलांची आकडेवारी दिली आहे.जगात २४ कोटी हुन अधिक मुले स्वच्छतागृहाविना आहेत.भारतात पाच कोटी मुले अशा वर्गात मोडतात .भारताखेरीज इतर देशातील अशा मुलांची आकडेवारी या प्रमाणे आहे .नायजेरिया -- ३.४० कोटी , इथिओपिया --- २.६० कोटी , कांगो -- १.१० कोटी , इंडोनेशिया --- ८० लाख . शाळांमध्ये आरोग्य सुविधा उपल्बध नसलेल्या मुलांची संख्या भारतात तब्बल दोन कोटी आहे ही बातमी नुकतीच वाचण्यात आली . एकूणच स्वातंत्र्यानंतर सुमारे सात दशकानंतर सुद्धा एवढी विदारक अवस्था विद्यार्थ्यांच्या स्वच्छता गृहा बाबत असेल तर त्याचा गांभीर्याने विचार व्हावयास हवा . देशातील सवर्च राज्य सरकारांनी योजनांबद्द कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांना स्वच्छता गृहाच्या सोयी उपलब्ध करून द्याव्यात.

**शांताराम वाघ**

## श्राद्धविधीची टिंगल करणे कृतघ्नपणा!

अपार कष्ट करून आपल्याला लहानाचे मोठे करणाऱ्या मातापित्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी श्राद्धविधी केला जातो; परंतु ज्यांना या विधीविषयी श्रद्धा किंवा कृतज्ञतेची भावना नसते, असे लोक सामाजिक प्रसारमाध्यमांवरून या विधीची टर उडवताना दिसतात. महालय काळात 'तयार पिंड मिळेल', 'दहीभात मिळेल' किंवा 'कावळा भाड्याने मिळेल' अशा प्रकारचे उपहासात्मक मेसेज पाठवले जातात. श्राद्धविधीची टिंगलटवाळी करणे म्हणजे आपल्यावर असलेल्या पितरांच्या उपकारांची जाणीव नसणे असाच त्याचा अर्थ होतो. हा एक प्रकारचा सामाजिक आणि धार्मिक कृतघ्नपणा आहे. असे संदेश पाठवणे किंवा ते पुढे शेअर करणे हे एक प्रकारे पापच आहे. म्हणूनच, असा संदेश पाठवणाऱ्या व्यक्तीची चूक त्याच वेळी त्याच्या लक्षात आणून देणे आणि त्याचे प्रबोधन करणे ही काळाची गरज आहे. ही जाणीव निर्माण करणे हादेखील आपल्या संस्कृती रक्षणाचाच एक भाग आहे.

**दीपाली गीते**

## शून्य सहिष्णुता

भारत सध्या दहशतवादाविरोधात 'शून्य सहनशीलता' हे धोरण अवलंबत असून, सीमापार कारवायांना चोख प्रत्युत्तर देण्याचा देशाचा निर्धार कायम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'च्या १३८ व्या भागात २०१६ मधील ऐतिहासिक सर्जिकल स्ट्राइकची आठवण करून दिली. भारतीय लष्कराने २८-२९ सप्टेंबर २०१६ रोजी पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर यशस्वी कारवाई करून संपूर्ण जगाला भारताच्या सामर्थ्याची जाणीव करून दिली होती. 'शांतता हवी असेल तर युद्धाची तयारी करा' या तत्त्वावर चालत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी देशाची संरक्षण सज्जता भक्कम असल्याचे स्पष्ट केले आहे. भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी भारताचे कठोर नियोजन सुरू आहे. याचाच भाग म्हणून आता अवकाश, संगणकीय क्षेत्र, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवरहित विमाने यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा युद्धतंत्रात समावेश केला जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन आपली संरक्षण क्षमता सातत्याने वाढवणे हेच भारताचे मुख्य धोरण असणार आहे.

**जयवंत चव्हाण**

## शाळांमधील असुविधा

युनिसेफ आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, भारतातील तब्बल पाच कोटी मुलांना शाळांमध्ये स्वच्छतागृहाची मूलभूत सुविधा उपलब्ध नाही, ही अत्यंत धक्कादायक बाब आहे. आपण एकीकडे शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या गप्पा मारतो, मात्र विद्यार्थ्यांना प्राथमिक आणि आवश्यक सोयीदेखील देऊ शकत नाही, ही अत्यंत शरमेची बाब आहे. सध्याच्या शैक्षणिक व्यवस्थेने विद्यार्थ्यांच्या पाठीवरील पुस्तकांचे ओझे वाढवले आणि तीन-तीन भाषांची सक्ती करण्याची तयारी दाखवली; परंतु त्यांना आरोग्यविषयक मूलभूत सुविधा देण्याची आवश्यकता मात्र प्रशासनाला वाटत नाही. देशाचे भवितव्य घडवणारी उद्याची तरुण पिढी जर अशा प्राथमिक सुविधांपासून वंचित राहणार असेल, तर हा कारभार देशासाठी नक्कीच भूषणावह नाही. विद्यार्थ्यांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्राथमिक कर्तव्य आहे. आंतरराष्ट्रीय संघटनांनी बोट दाखवून आपली चूक दाखवून देण्याची वेळ आपल्यावर यायला नको होती.

**- हेमंतकुमार मेस्त्री**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# पावसाच्या खंडामुळे खरीपा सोबतच रब्बी हंगामाला धोका

## उपलब्ध ओलाव्यानुसारच पेरणी करण्याचा कृषी विभागाचा सल्ला

**अमरावती/का.प्र.**

ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने खरीप हंगामासोबतच आगामी रब्बी हंगाम २०२६-२७ वरही पावसाच्या खंडाचा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.पुढील काही दिवसांत समाधानकारक पाऊस न झाल्यास भूजल पातळीवर विपरीत परिणाम होऊन विहिरी, बोअरवेल आणि अन्य भूजलस्त्रोतांच्या उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.परिणामी रब्बी ज्वारी, हरभरा, गहू व अन्य पिकांच्या पेरणी क्षेत्रात घट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

परतीचा पाऊस न झाल्यास रब्बी पेरणीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात घटू शकते. त्यामुळे उपलब्ध जमिनीतील ओलाव्याच्या आधारेच रब्बी पेरणीचे क्षेत्र निश्चित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.अत्यल्प ओलावा असलेल्या हलक्या जमिनीत पेरणीची घाई न करता खोल व मध्यम काठ्या जमिनीत उपलब्ध ओलाव्यानुसार पेरणीला प्राधान्य देण्याचा सल्ला देण्यात आला आहे. प्रत्येक गावात विहिरी, बोअरवेल, शेततळे व अन्य जलस्त्रोतांमध्ये उपलब्ध पाण्याचे प्रमाण निश्चित करून त्यानुसार सिंचनाखालील क्षेत्र आणि पिकांचे नियोजन करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.



**रब्बीतील गव्हाचे क्षेत्र घटणार**

संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास हरभरा आणि रब्बी ज्वारीला प्राधान्य देऊन उपलब्ध पाण्यानुसारच गव्हाचे क्षेत्र निश्चित करावी असा सल्ला कृषी विभागाकडून दिल्या जात आहे. पाण्याची तीव्र कमतरता असल्यास गहू आणि अधिक पाणी लागणाऱ्या पिकांचे क्षेत्र अत्यंत मर्यादित ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सद्याची स्थिती पाहता यंदा गव्हाचे पेरणी क्षेत्र मोठ्या प्रमाणात घटण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

**उपाययोजना करा**

संपूर्ण क्षेत्राला पाणी देण्याऐवजी पिकाच्या महत्त्वाच्या संवेदनशील अवस्थेत संरक्षित सिंचन करावे. जमिनीत भेगा पडल्यास योग्य वेळी हलकी आंतरमशागत करावी. तसेच पीक अवशेष आणि सेंद्रिय पदार्थांचा आच्छादन म्हणून वापर करून जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. जमिनीत पुरेसा ओलावा उपलब्ध झाल्यानंतरच पेरणी करावी. खोल काळ्या जमिनीत रब्बी ज्वारी व हरभरा, तर मध्यम जमिनीत हरभरा आणि रब्बी ज्वारी घेण्याचे नियोजन करावे. स्थानिक परिस्थितीनुसार कमी कालावधीची पिके घेण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.

## बहुउद्देशीय नागरी सह पतसंस्थेची वार्षिक साधारण सभा



**अमरावती/का.प्र.**

शहरातील बहुउद्देशीय नागरी सहकारी पतसंस्थेची ३५ वी वार्षिक साधारण सभा अहिल्या मंगलम विवेकानंद कॉलनी, अमरावती या कार्यालयात पार पडली.सभेच्या सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ दिपप्रज्वलन थोर पुरुषांच्या-प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. तसेच संस्थचे सन २०२५-२६-मध्ये दिवगंत झालेल्या सभासदांना श्रध्दांजली देण्यात आली. सर्व प्रथम संस्थेच्या जेष्ठतम सभासदांचा शाल व श्रीफळ तसेच १० वी व १२ वीत गुणवत्ता प्राप्त सभासदांच्या पाल्यांचा रोख पारीतोषीक व प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

तपश्चात मागील सभेच्या इतिवृत्तास मंजुरी दिल्या नंतर सन २०२५ -२०२६ च्या अहवालाचे वाचन संस्थेचे अध्यक्ष प्रकाश उर्फ नानासाहेब बोके यांनी केले. सभेत उपस्थित संचालकांनी विषय सुची वरिल विषयांची क्रमशः मांडणी करुन त्यास सभेची सर्वानुमते मंजुरी घेण्यात आली.

अतिशय खेळीमेळी च्या वातावरणात संपन्न झालेल्या या सभेत बहुसंख्येने सभासद हजर होते. जेष्ठ संचालक वि.सु.गोळे यांनी केलेल्या आभार प्रदर्शनानंतर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या राष्ट्रवंदनेने सभेची सांगता झाली.

# दुष्काळाच्या स्थितीत सुरळीत वीज पुरवठ्यासाठी सज्ज राहा

## संचालक धनंजय औंढेकर यांचा जनमित्रांशी संवाद



**अमरावती/का.प्र.**

राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळाच्या सावटात शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी महावितरण ची जबाबदारी अधिक वाढली आहे. या गंभीर परिस्थितीत प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपापल्या मुख्यालयातच राहणे बंधनकारक असून, कामात हयगय अथवा गैरहजेरी खपवून घेतली जाणार नाही.असे स्पष्ट निर्देश संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी दिले.

अमरावती डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय प्रांगणातिल छत्रपती श्री. शिवाजी महाराज सभागृहात परिमंडळातील जनमित्रांशी त्यांनी थेट संवाद साधला. यावेळी मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता दिपक देवहाते (अमरावती), रूपेश टेंभुर्णे (यवतमाळ), अनिल काळे (पायाभूत आराखडा) यांच्यासह सर्व विभागीय कार्यकारी अभियंते, सर्व विभाग प्रमुख, अभियंते व जनमित्र, यंत्रचालक यांची उपस्थिती होती.यावेळी बोलतांना श्री. औंढेकर म्हणाले की, दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून परिमंडळातील सर्व कृषी ग्राहकांना शक्यतो दिवसाच सुरळीत वीज पुरवठा मिळेल याची खात्री करा. तसेच एखादा ट्रान्सफॉर्मर (रोहित्र) नादुरुस्त किंवा जळाल्यास तो २४ तासांच्या आत तातडीने बदलून देण्याचे स्पष्ट आदेश त्यांनी दिले. यासाठी आवश्यक नवीन रोहित्र आणि ऑईल सर्व मंडळ कार्यालयांकडे आधीच उपलब्ध करून देण्यात आले असल्याने रोहित्राच्या कामात कोणताही विलंब सहन केला जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच अकृषक ग्राहकांना २४ तास खात्रिशीर वीज देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

महावितरणचे मिशन आणि व्हिजन स्पष्ट करतांना संचालक श्री. औंढेकर यांनी कंपनीच्या वाटचालीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

वीजचोरीविरुद्ध महावितरणने अत्यंत आक्रमक भूमिका स्वीकारली असून ही मोहीम यापुढेही सातत्याने सुरूच ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले. वीज वितरण व्यवस्थेची कार्यक्षमता वाढविणे, वीजग्राहकांना तत्पर व दर्जेदार सेवा देणे आणि कंपनीच्या महसुलात वाढ करणे हे अत्यंत महत्त्वाचे घटक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# चांदूर रेल्वेत श्वानांचा सुळसुळाट; नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

शहरातील विविध भागांत मोकाट श्वानांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रस्त्यांवर, चौकांमध्ये तसेच वर्दळीच्या परिसरात मोठ्या संख्येने श्वानांचा वावर वाढला असून, नागरिकांना त्यांच्या हल्ल्याची भीती सतावत आहे.

विशेषतः काही श्वान आक्रमक असल्याने नागरिकांच्या मागे धावणे, चावा घेण्याचा प्रयत्न करणे अशा घटना घडत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.नगरपरिषद प्रशासनाकडून यावर कायमस्वरूपी उपाययोजना कधी होणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. केवळ काही दिवस श्वान पकडण्याची मोहीम राबवून पुन्हा परिस्थिती जैसे थे ठेवण्याऐवजी ठोस आणि सातत्यपूर्ण उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

नगरपरिषदेकडून विविध मोहिमा व उपक्रमांसाठी निवेदने, आदेश आणि प्रक्रिया होत असतात; मात्र नागरिकांच्या दैनंदिन सुरक्षिततेशी संबंधित या प्रश्नावर प्रत्यक्षात ठोस कारवाई कधी होणार? अशी चर्चा शहरात सुरू आहे.मोकाट श्वानांच्या समस्येवर केवळ कागदी कारवाई न करता प्रत्यक्ष श्वान पकडण्याची मोहीम, आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय आणि कायद्यानुसार कायमस्वरूपी व्यवस्थापन करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# शीतपेय निर्मिती उद्योगाचा समाज कल्याण अधिकाऱ्यांकडून आढावा



**अमरावती/का.प्र.**

सेवा संकल्प अभियानांतर्गत समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी समाज कल्याण विभागातील अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष भेटी दिल्या जात आहेत. या उपक्रमांतर्गत नांदगाव पेठ येथील नवीन एमआयडीसी परिसरातील 'संबोधी ॲग्रो फूड अँड ब्रेव्हरीज' या उद्योगाला समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त माया केदार, सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर आणि इतर अधिकाऱ्यांनी भेट देऊन उद्योगाच्या प्रगतीची माहिती घेतली.

योजनेअंतर्गत एकूण प्रकल्प किमतीच्या लाभार्थ्यांच्या २५ टक्के स्वहिस्स्यापैकी जास्तीत जास्त १५ टक्के रक्कम शासनाकडून मार्जिन मनी म्हणून अनुदानात्मक स्वरूपात उपलब्ध करून दिली जाते.योजनेचा लाभ घेत उद्योजक नीतू पंकज भालचक्र यांनी नांदगाव पेठ, नवीन एमआयडीसी, अमरावती येथे 'संबोधी ॲग्रो फूड अँड ब्रेव्हरीज' हा उद्योग सुरू केला आहे. या उद्योगात जीरा सोडा, ऑरेंज सोडा, जलजीरा सोडा आणि पुदिना फ्लेवर्ड शीतपेयांचे उत्पादन केले जाते. स्थानिक पातळीवर उत्पादन करून त्याची बाजारपेठेत विक्री करण्याच्या माध्यमातून व्यवसायाचा विस्तार करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

समाज कल्याण विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उद्योगाला भेट देऊन उत्पादन प्रक्रिया व उद्योगाच्या प्रगतीची माहिती घेतली. महिला उद्योजकतेला प्रोत्साहन देत आर्थिक स्वावलंबनाची दिशा निर्माण करणारे असे उद्योग इतरांसाठीही प्रेरणादायी ठरतात. स्टँड-अप इंडिया योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या संधींचा लाभ घेऊन नवीन उद्योग उभारावेत आणि रोजगारनिर्मितीला हातभार लावावा, असे आवाहन माया केदार यांनी केले. त्यांनी लाभार्थीला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# संक्षिप्त

## विभागीय आयुक्त कार्यालयात तक्रार निवारण कक्ष

**अमरावती-** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विभागीय स्तरावर तक्रार नियंत्रण/निवारण कक्ष विभागीय आयुक्त कार्यालयात स्थापन करण्यात आला आहे. तक्रारदारांना निवडणुकीसंदर्भातील तक्रारींची नोंद प्रत्यक्ष तक्रार निवारण कक्षात तसेच ई-मेलद्वारेही करता येणार आहे. तक्रार निवारण कक्षाचा पत्ता नैसर्गिक आपत्ती कक्ष, पहिला माळा, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती असा असून तक्रारींसाठी ई-मेल: dycomm.amt@gmail.com आणि दूरध्वनी क्रमांक : ०७२१-२६६१३६४ व टोल फ्री क्रमांक : १८००४२५२१६४ असा आहे. यांची संबंधितांनी नोंद घ्यावी. असे विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त (आस्थापना) अमरावती विभाग, अमरावती यांनी कळविले आहे.

## 'खादी महोत्सवा'ला प्रारंभ

**अमरावती-** राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या वतीने बुधवार, ३० सप्टेंबर ते शनिवार, ३ ऑक्टोबर दरम्यान भव्य खादी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव बस स्थानकासमोरील सायन्सकोर मैदानावरील 'मेळघाट हाट' येथे आयोजित केला जात आहे.आदिवासी आणि ग्रामीण भागातील महिलांनी सौर चरख्यावर स्वतः सूत कातून व शिवणकाम करून तयार केलेली दर्जेदार खादी व सौर खादी उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत. या महोत्सवात सर्व खादी उत्पादने ग्राहकांना सवलतीच्या दरात मिळतील. खादी कापड, विविध प्रकारची खादी वस्त्रे आणि इतर हस्तकलेवर आधारित वस्तूंचे स्टॉल्स या ठिकाणी लावण्यात येणार आहेत.ग्रामीण व आदिवासी भागातील महिलांच्या हाताला रोजगार मिळवून देण्यासाठी आणि स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी या खादी महोत्सवाला भेट द्यावी, असे आवाहन खादी व ग्रामोद्योग मंडळाचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदिप चेचरे यांनी केले आहे.

## जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा करा

**अमरावती-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे १ ऑक्टोबर रोजी संपूर्ण राज्यभरात 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस' साजरा करण्यात येणार आहे. त्यानुसार सर्व शासकीय, निमशासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांनी यानिमित्ताने विविध उपक्रम आयोजित करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.ज्येष्ठ नागरिक दिवसानिमित्त कार्यालय व स्थानिक पातळीवर सार्वजनिक पदयात्रा, प्रभात फेऱ्या, सभा, परिसंवाद आणि आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे. समाजकार्यात विशेष योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांचा आणि ज्येष्ठांसाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचा विशेष सत्कार व गौरव करण्यात यावा. ज्येष्ठ नागरिकांचे हक्क, त्यांच्यासाठीच्या शासकीय योजना, वैद्यकीय सोयी-सुविधा आणि मदतीसाठी असलेल्या हेल्पलाइनबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे.ज्येष्ठ नागरिकांना वृद्धापकाळात सुसह्य जीवन जगता यावे, त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुस्थितीत राहावे आणि त्यांना राज्य शासनाच्या सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरणाचा पूर्ण लाभ मिळावा, या उद्देशाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशा सूचना देण्यात आल्या आहे.

## वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्रासाठी अकोल्याचा पर्याय

**अमरावती-** प्रादेशिक परिवहन कार्यालय , अमरावती यांच्या अधिनस्त अंजनगाव बारी (बडनेरा) येथील वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्र तसेच अत्याधुनिक व संगणकीकृत चाचणी पथकाचे काम सध्या अपूर्ण असल्याने वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र (फिटनेस सर्टिफिकेट) नूतनीकरणाचे काम सद्यास्थितीत पूर्णपणे बंद करण्यात आले आहे. सर्व वाहनधारकांनी नजीकच्या अकोला जिल्ह्यात किंवा इतर जिल्ह्यात जाऊन आपल्या वाहनांची तपासणी व नूतनीकरण करून घ्यावे, अशी माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी दिली आहे. ज्या वाहनधारकांनी अद्याप आपल्या वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्राचे नूतनीकरण केलेले नाही किंवा ज्यांच्या प्रमाणपत्राची मुदत येणाऱ्या काळात संपत आहे, अशा सर्व वाहनधारकांनी पूर्वपरवानगी घेऊन आणि ऑनलाईन तारीख आरक्षित करून अकोला किंवा नजीकच्या इतर जिल्ह्यात जाऊन आपल्या वाहनांची तपासणी व नूतनीकरण करून घ्यावे.

## माजी विद्यार्थी कडून स्पर्धात्मक पुस्तके भेट

**अमरावती**-श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. राजाराम जाधव, सह सचिव, सेवानिवृत्त महाराष्ट्र शासन, यांच्या कडून महाविद्यालयास स्पर्धा परीक्षांची पुस्तके घेण्यासाठी आर्थिक सहाय्य करण्यात. आले.महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी लेखक कवी राजाराम जाधव लिखित चरित्रात्मक लेखसंग्रह'माझ्या जीवनातील प्रेरणादाई सप्तर्षी' आणि काव्यसंग्रह'नांदी सामाजिक परिवर्तनाची ' या साहित्यकृतीचा प्रकाशन सोहळा पार पडला.

# 'विदर्भ साहित्य संघ आपल्या दारी'

## लेखिका रंजना कराळे यांचा सत्कार



**अमरावती/का.प्र.**

'विदर्भ साहित्य संघ आपल्या दारी' या अमरावती शाखेच्या अभिनव उपक्रमाअंतर्गत लेखिका रंजना कराळे यांचा 'झिली' हा कथासंग्रह नुकताच प्रकाशित झाल्याबद्दल विदर्भ साहित्य संघ अमरावती शाखेतर्फे त्यांचे घरी जाऊन बुके, शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

लेखिका रंजना कराळे या अमरावती जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कवयित्री, गजलकार व उत्तम सूत्रसंचालिका असून त्या महाराष्ट्रातील सर्जनशील शब्दवेल साहित्य संघाच्या केंद्रीय उपाध्यक्षा आहेत. 'मैत्रगंध' हा त्यांचा कवितासंग्रह प्रकाशित असून त्यानंतर 'झिली' हा कथासंग्रह त्यांचे दुसरे प्रकाशन आहे.विदर्भ साहित्य संघ अमरावती शाखेचे अध्यक्ष डॉ. श्यामसुंदर निकम, सचिव आबासाहेब कडू, उपाध्यक्ष दीपक दारव्हेकर, प्रसिद्धी विभाग प्रमुख विशाल कन्हेरकर,गजाननराव कराळे इ.उपस्थित होते.

या सत्कार सोहळ्यास मा. डॉ. शोभा रोकडे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची विशेष उपस्थिती लाभली.याप्रसंगी विदर्भ साहित्य संघ अमरावती शाखेचे अध्यक्ष डॉ. श्यामसुंदर निकम यांनी लेखिका रंजना कराळे यांना पुढील साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्यात.

# तेरवीच्या कार्यक्रमाला पर्यावरणाची जोड

**दर्यापूर/वार्ताहर**

'झाड जगवणे हीच खऱ्या अर्थाने मृतात्म्याला श्रद्धांजली आहे. आपण लावलेले एक झाड उद्या कुणाच्या माथ्यावर सावली देईल, कुणाला गोड फळ देईल, एखाद्या पक्ष्याला निवारा देईल आणि असंख्य जीवांना शुद्ध हवा देईल...' या हृदयस्पर्शी शब्दांतून ह.भ.प. श्री. रामकृष्ण महाराज अकोटकर यांनी बोराळा येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

दर्यापूर तालुक्यातील बोराळा येथे स्व.प्रकाश चौधरी यांच्या तेरवीच्या कार्यक्रमाला अनोखी पर्यावरणपूरक जोड देण्यात आली. पारंपरिक धार्मिक विधींसोबत ह.भ.प. श्री. रामकृष्ण महाराज अकोटकर यांच्या भावपूर्ण कीर्तनाचे आयोजन करण्यात आले. या कीर्तनातून त्यांनी उपस्थित ग्रामस्थ, नातेवाईक आणि पाहुण्यांना पर्यावरण संरक्षणाची जाणीव करून देत, 'प्रत्येक कुटुंबाने आपल्या आनंदाच्या अथवा दुःखाच्या प्रसंगी किमान एक तरी झाड लावून ते जगवावे,' असे भावनिक आवाहन केले.



**पाहुण्यांना बेल- तुळस आणि फळझाडांची रोपे भेट**

तेरवीसाठी आलेल्या पाहुण्यांना विविध वृक्षांची रोपे प्रेमपूर्वक भेट देण्यात आली. यामध्ये ७१ बेलवृक्षांची रोपे, ७१ तुळशीची रोपे, ७१ सीताफळ, ७१ आंबा, ७१ फणस, ७१ पेरू, ७१ कवठ, ७१ कडुनिंब तसेच चारोळी आदी विविध वृक्षांच्या रोपांचा समावेश होता. या उपक्रमामुळे तेरवीचा कार्यक्रम हा केवळ एका कुटुंबाचा शोकप्रसंग न राहता, पर्यावरण संवर्धनाची सामाजिक चळवळ बनविण्याचा प्रयत्न ठरला.

यावेळी पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे चिरंजीव अरुण सपकाळ, श्रीमती उषा चौधरी, विजया रोडे, साधना खुळे, निर्मला आखरे, शोभा तायडे, पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ ट्रस्टचे जनसंपर्क अधिकारी मुकेश चौधरी, मंगेश चौधरी, संत गाडगे बाबा बालगृहाचे व्यवस्थापक गजानन देशमुख, राज्य वन्यजीव बोर्डाचे माजी सदस्य यादव तरटे पाटील, डॉ. शिरीष नाईक, सुनील कडू, विनाकाय कडू, रितेश वानखडे, मनोज पाटील तायडे यांच्यासह गावातील नागरिक, नातेवाईक आणि पाहुणे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पर्यावरणाशी बांधिलकी जोपासली – अरुण सपकाळ**

*'स्व. श्री. प्रकाशराव विश्वनाथराव चौधरी यांच्या तेरवीच्या कार्यक्रमाला एका वेगळ्या, समाजोपयोगी आणि पर्यावरणपूरक संकल्पाची जोड देण्यात आली आहे. नातेवाईक व पाहुण्यांना वृक्षांची रोपे भेट देऊन चौधरी परिवाराने पर्यावरणाशी असलेली आपली बांधिलकी कृतीतून जपली आहे. या रोपांचे संवर्धन झाले, तर आज दिलेली ही छोटीशी भेट उद्या मोठ्या हिरवाईत रूपांतरित होईल,' अशी भावना पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे चिरंजीव अरुण सपकाळ यांनी व्यक्त केली.*

# एस आय आर : सत्ता गाजवण्यासाठी प्रस्थापित व्यवस्थेच्या हातातील हत्यार !

एसआयआरच्या तांत्रिक बाबी, १३ कोटी नागरिकांची नावे वगळली जाणे , दोन निवडणूक आयुक्तांनी मुख्य निवडणूक आयुक्तांच्या 'अ'ज्ञानेशकुमार यांच्या मनमानी कारभाराविरुद्ध केंद्र सरकारच्या मुख्य सचिवांकडे तक्रार करणे, इंडियन एक्सप्रेसच्या रितिका चोप्रा यांनी केलेली भांडाफोड, R K Singh या भाजपच्या नेत्याने देशाला लिहिलेले खुले पत्र.....देशभर सुरु झालेली आंदोलने देशातील लोकशाही जिवंत ठेवणाऱ्या या सगळ्याचे स्वागत!

या सगळ्याच्या मुळाशी आहे राज्यकर्त्या भाजपचा 'हम करेसो कायदा' हा अहंगंड आणि भारतातील सामान्य नागरिकांच्या प्रति असणारा नोकरशाही, बँकिंग आणि एकूणच प्रस्थापित व्यवस्थेचा तुच्छताभाव! हे नवीन नाही. हे होत आले आहे. एसआयआर ही त्यातील अजून एक कडी आहे एवढेच!

नावाचे स्पेलिंग, आई वडिलांचे नाव जुळत नाही, अशा क्षुल्लक (Easily Correctable) कारणांवरून सुरु असलेल्या SIR मधून लाखो भारतीय नागरिकांची नावे त्या अ-ज्ञानी कुमारने वगळली;ज्या कोट्यवधी नागरिकांच्या अनेक पिढ्या या देशाच्या मातीत मिसळल्या त्या नागरिकांना हे सुटेड बुटेड स्वतःला प्रोफेशनल म्हणवणारे नागरिकांना आपले घटनादत्त अधिकार सिद्ध करायला सांगत आहेत.सिस्टीम मधील तुच्छताभाव आणि असंवेदनशीलता यांची असंख्य उदाहरणे देता येतील.

ज्या शेतकऱ्यांकडे आवश्यक स्मार्टफोन, इंटरनेट किंवा साक्षरता नाही त्यांना पिक विमा पाहणी अहवाल स्वतःलाच करायला सांगतात; तो झाला नाही तर नुकसान भरपाई मिळत नाही किंवा दिरंगाई होते. त्या पैशातून शेतकरी पुढच्या हंगामाची आखणी करत असतो हे जणू यांना काही माहित नाही. त्याचाच पुढचा भाग म्हणजे सिबिल स्कोर नाही/अपडेटेड नाही/क्रेडिट रेटिंग नाही म्हणून बँका शेतीच्या मोसमात शेतकऱ्यांना कर्ज नाकारत असतात.

लाखो गरीब निरक्षर स्त्री पुरुष अमुक कागद दिला नाही, अंगठा किंवा सही जुळत नाही म्हणून शासनाच्या कल्याणकारी योजनातून मिळणारे तुटपुंजे काही शे किंवा हजारभर रुपये रिलीज केले जात नाहीत.

फारशा बचती करू न शकणारे/पेन्शनर्स/मिनिमम बॅलन्स ठेवू शकत नाहीत. तरी देखील त्यांच्या खात्यातून हजारो कोटी रुपये दंड वसुली केली जाते. कोणी गंभीर आजारी पडले/इस्पितळात भरती झाल्याची नोटीस वेळेवर दिली नाही किंवा अनेकानेक कागदपत्रांची पूर्तता केली नाही म्हणून आरोग्य विमा नाकारला जातो किंवा क्लेमच्या रकमेत घट केली जाते. कमी क्लेम्स रेशो ठेवून विमा कंपन्या नफा कमवतात.

आता याच प्रणालीच्या केंद्रस्थानी असणाऱ्या वित्त भांडवलाचे बघा. परतफेडीची




क्षमता नसणाऱ्या कोट्यवधी कर्जगारांना लाखो कोटी रुपयांची रिटेल, मायक्रो लोन पाजताना त्यांना गरिबांकडून फारशी कागदपत्रे लागत नाहीत. अशी अनेक उदाहरणे आहेत.

भारतातील कोट्यावधी ग्रामीण आणि शहरी भागातील प्रौढ स्त्री पुरुष, शेतीशी संबंधित, स्वयंरोजगार करणारे,आदिवासी बांधव!त्यांचे शिक्षण ते किती, इंग्रजी भाषेचे ज्ञान ते किती, समोरच्या सरकारी किंवा बँक अधिकाऱ्याच्या डोळ्याला डोळा भिडवण्याचे धैर्य ते किती, त्यांच्यापाशी सगळ्या ठिकाणी पुरावे म्हणून मागितली जाणारी कागदपत्रे (डिजिटल जाऊद्या) ती किती?..... कॉम्प्युटर मध्ये कोणी व्यक्ती बसलेली असते असा समज आत्ता आत्ता पर्यंत आपल्या देशात होता. अजूनही आहे.

काही तरी भान ठेवाल की नाही? शहरी मध्यमवर्ग आणि देशातील ८० टक्के जनता यांना दिल्या जाणाऱ्या ट्रीटमेंट मध्ये काही differentiation नको? Concession नाही म्हणत ट्रीटमेंट मध्ये differentiation म्हणत आहे.

या कोट्यावधी नागरिकांची सर्वसाधारण निरक्षरता,वित्तीय निरक्षरता, डिजिटल निरक्षरता, इंग्रजी भाषा अवगत नसणे, स्मार्टफोन किंवा इंटरनेटची सुविधा नसणे या सगळ्याची माहिती असून या साऱ्या यंत्रणा अशा माहिती, डेटा, कागदपत्रे सघन योजना लॉन्च करतात आणि निष्ठुरपणे राबवतात.

**कोणत्याही निवडणुकांचे कॅलेंडर पाच वर्षे आधी माहित असते. मग एसआयआर एवढ्या 'ब्रेक नेक स्पीड' ने राबवण्याची गरज काय?ही काही गरज नाही. ही दहशत आहे प्रस्थापित व्यवस्थेची.**

यातून जनता सतत vulnerable राहते. अनिश्चिततेच्या दहशतीखाली राहते. हे अनवधानाने नाही सहेतुक आहे. SIR बदल एकच प्रश्न विचारा. कोणत्याही निवडणुकांचे कॅलेंडर पाच वर्षे आधी माहित असते. मग SIR एवढ्या ब्रेक नेक स्पीड ने राबवण्याची गरज काय?ही काही efficiency नाही. ही दहशत आहे प्रस्थापित व्यवस्थेची.

नियम म्हणजे नियम, रुल म्हणजे रुल असे सांगत आपण कायदा आणि नियम प्रणालीचे राखणदार आहोत असा अविर्भाव असतो प्रस्थापित व्यवस्थेच्या शिलेदारांच्या. मग शंभरातील ९९ वेळा तो कोठे जातो?

प्रस्थापित वर्गातून आलेल्या व्यक्तींना, कॉर्पोरेटना नाना मार्गाने accommodate करताना (आठवा, लाखो कोटी रुपयांची कर्जमाफी, NCLT, अनुभव नसताना विमानतळ देणे) हेच प्रोफेशनल्स त्या कायद्यांची आणि नियमांची वही सुरळी करून घालून घेतात आणि निपचित पडून राहतात. न्यायव्यवस्थेतील यांचे भाईबंद हे शासनाचे धोरणात्मक निर्णय आहेत म्हणून आमच्या अखत्यारीत येत नाहीत म्हणून डोळ्यावर चादर ओढून त्यातून सगळे बघत, ऐकत असतात.

हे लोक कायदे आणि नियम जणू काही गुरुत्वाकर्षणाच्या नियमासारखे आहेत असा आपला ब्रेनवॉश करतात. हे सर्व कायदे आणि नियम त्यांनीच बनवलेले असतात,दबाव आला, खोके पेट्या पोचल्या की त्यात ते बदल देखील करतात. हे ते सांगणार नाहीत. अडाणीपणाचा दोष आपला आहे.

घृणा येते स्वतःला प्रोफेशनल म्हणून घेणाऱ्या या प्रणालीबद्दल. आणि ती चालवणाऱ्या सूटेड बुटेड, देशी परदेशी शिक्षण संस्थांतून उच्च शिक्षण घेतलेल्या मध्यम /उच्च मध्यमवर्गीय प्रोफेशनलबद्दल. ओरिजनल विचार क्षमता गमावलेली, कणा नसलेली, हृदयात ओलावा नसलेली लोक आहेत ही.

सगळा इंग्रजी भाषेचा खेळ. वाकवावी तशी वाकणारी, या भाषेतून समाज, राजकारण, अंतरराष्ट्रीय सबंध, बँकिंग, कॉर्पोरेट क्षेत्रातील त्यांनी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाचे समर्थन ही मंडळी करू शकतात. मानवी जीवन, सामुदायिक जीवन शब्दांच्या पलीकडे वास करत असते हे यांना कोण सांगणार.

**संजीव चांदोरकर**

## त-ड-का

### भाग्योदय



जीवंतपणी मायबापाचे
करू नका हाल
त्यांच्या आर्शिवादानेच
येत असतो उदयकाळ...

जित्यापणी आई बाबांची
करून घ्यावी सेवा
मेल्यावर कशाले
गाव जेऊ घालता देवा...!

'हम दो हमारे दो'च्या
नादात
जेष्ठांचे दुखवू नये मन
पितृपक्षात हिंदू संस्कृती
करुन देते याचे स्मरण..



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
९४२१३९४३३९

# 'कौटुंबिक विघटन'

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन.व्ही.अंजारीया यांनी गुहाटी (आसाम) येथे कार्यक्रमात असे सांगितले की,'भारताचे संस्कार आणि वसुधैव कुटुंबकम् आता विसरून जा, कारण आज आपण एका कुटुंबालाही एकत्र ठेवण्यासाठी संघर्ष करत आहोत'. स्वतःचे कुटुंब टिकवणे आज अवघड झाले आहे.न्यायाधीशांच्या मते, कौटुंबिक वादात न्यायालयाकडून लादलेले निर्णय कृत्रिम आणि अन्याय करणारे वाटू शकतात.त्यामुळे मध्यस्थी हाच उत्तम मार्ग आहे.

आज एकाच घरात राहूनही माणसे परस्परांपासून दुरावली आहेत. स्वार्थ,अहंभाव, सहनशीलतेचा अभाव आणि भौतिक वादाच्या आंधळ्या शर्यतीमुळे कौटुंबिक न्यायालयात घटस्फोट,कौटुंबिक हिंसाचार आणि वृद्ध माता त्यांच्या उपेक्षेच्या याचिकांचा डोंगर सतत वाढत आहे. ज्या देशात परक्यांनाही कुटुंब मानले जात होते तिथे आज रक्ताची नातीच एकमेकांची वैरी बनत आहे.

पाश्चात्त देशात घटस्फोटाचे प्रमाण ५०% हून अधिक आहे.' लिव्ह इन रिलेशनशिप'एकल पालकत्व आणि एकाकीपणा




यांच्यासारख्या सामाजिक समस्यांनी उग्ररूप धारण केले आहे. वृद्धाश्रमांची संस्कृती फोफावली असून वृद्धांना एकाकीपणात मरण पत्करावे लागत आहे.दुर्दैवाने देशाने पाश्चात्यांची ही विधातक जीवनशैली आणि सांस्कृतिक विकृती स्वीकारली आहे.

चित्रपट,वेब सिरीज आणि सामाजिक माध्यमे यांच्या माध्यमातून 'स्वातंत्र्य'या नावाखाली स्वैराचार आणि कौटुंबिक मूल्यांची पायमल्ली केली जात आहे.'कौटुंबिक विघटनाचे' परिणाम केवळ चार भिंतीपुरते मर्यादित राहत नाहीत तर संपूर्ण समाज आणि राष्ट्र यावर त्याचे दूरगामी दुष्परिणाम होतात. कौटुंबिक पाठबळ नसल्यामुळे तरुण पिढी आणि लहान मुले नैराश्य, व्यसनाधीनता आणि आत्महत्या याकडे वळत आहे.परिस्थिती अशीच राहिली तर येत्या काही दशकात भारतातील कुटुंब व्यवस्था पूर्णपणे कोलमडेल. भारताचे लोकसंख्या शास्त्र बदलेल, सामाजिक सुरक्षेचे जाळे नष्ट होईल आणि एकाकीपणातून निर्माण होणाऱ्या मानसिक आजारांची मोठी लाट येईल. कुटुंब नावाचा आधारवडच उरणार नाही.

आजची 'जेन झी'ही पिढी डिजिटल युगात वाढलेली आहे. ही पिढी मानसिक दृष्ट्या अधिक संवेदनशील असली तरी नातेसंबंध टिकवण्याच्या संदर्भात धीर सुटणारी आणि व्यवहारवादी दिसते. नाते टिकवण्याची भीती आणि स्वातंत्र्य यामुळे ती लग्नापासून किंवा कौटुंबिक दायित्वापासून दूर पळताना दिसते. ही पिढी अत्यंत हुशार आणि तार्किक विचार करणारी आहे.जर तिला धर्माचे आणि कुटुंब व्यवस्थेचे वैज्ञानिक दृष्ट्या पटणारे महत्त्व सांगून सांगितले तर ते क्रांती घडू शकतात. सामाजिक माध्यमाचा वापर करून कौटुंबिक मूल्ये,मानसिक आरोग्य आणि धर्मसंस्कार यांचे महत्त्व सांगणारी नवीन चळवळ ही उभी ही पिढी उभी करू शकते.नात्यांमध्ये 'अहं' पेक्षा 'भावना' महत्त्वाची आहे. शिक्षण पद्धतीत केवळ नोकरी मिळवण्याचे धडे न देता संस्कार, नीतिमत्ता आणि भारतीय कौटुंबिक मूल्ये यांचा अभ्यासक्रम समाविष्ट करावा. ठिकठिकाणी कुटुंबप्रबोधन आणि समुपदेशन केंद्रे चालू करावी. कौटुंबिक स्नेह मेळावे आणि एकत्र येण्याच्या परंपरा यांना पुन्हा प्रोत्साहन द्यावे.काहींच्या मते आधुनिकतेच्या प्रवाहात कुटुंब संस्था वाचवणे अशक्य वाटू शकतील परंतु अशक्य गोष्ट शक्य करणे हेच भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे.भारताने इतिहासात अनेक आक्रमणे पचवली कारण आपली कौटुंबिक आणि सामाजिक रचना भक्कम होती.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीने दिलेली चेतावणी ही धोक्याची घंटा आहे.वेळेत जागे होऊन जर आपण घरोघरी धर्मशिक्षण संस्कार आणि साधनेचे महत्त्व रुजवले नाही तर आपण केवळ 'वसुधैव कुटुम्बकमच' नव्हे तर आपले स्वतःचेही घर गमावून बसू. कुटुंब वाचले तरच समाज वाचेल आणि समाज वाचला तरच राष्ट्र सुरक्षित राहील.

**लीना गाडगीळ**

# कावळ्याला दहिभाताचा घास देण्याची परंपरा

आपल्या संस्कृतीमध्ये आपल्या मृत पूर्वजांचे स्मरण करून त्यांच्या शांतीसाठी विविध धार्मिक विधी, श्राद्ध, इत्यादी केले जातात. त्यापैकी पितृपक्षात कावळ्याला अन्नाचा घास देण्याची परंपरा विशेष महत्त्वाची मानली जाते.धार्मिक मान्यतेनुसार, कावळा हा पितरांचे प्रतीक मानला जातो. पितृपक्षात रोज कावळ्याला दही, भाताचा घास आणि पाणी बाहेर नेऊन ठेवावा अशी पूर्वापार प्रथा आहे. श्राद्ध किंवा पितृपक्षाच्या वेळी पूर्वजांच्या नावाने अन्नाचा घास कावळ्यासाठी ठेवला जातो. कावळ्याने तो घास स्वीकारला, तर पितरांनी नैवेद्य स्वीकारला, अशी धार्मिक श्रद्धा आहे. काही पौराणिक मान्यतांमध्ये कावळ्याला यमराजाचा दूत किंवा संदेशवाहकही मानले जाते.कावळ्याला अन्न देण्यामागे पितरांचे स्मरण, कृतज्ञता आणि अन्नदानाची भावना आहे. तसेच



पक्ष्यांना अन्न मिळाल्याने निसर्गाशी असलेले आपले नातेही दृढ होते.

**आदिती देखणे**




# जागतिक वृद्धत्व दिवस

दरवर्षी १ ऑक्टोबर रोजी जगभरात साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांनी (UN) १४ डिसेंबर १९९० रोजी या दिवसाची घोषणा केली होती आणि १ ऑक्टोबर १९९१ रोजी हा दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला. या वर्षीची अधिकृत थीम: 'The Age of Longevity: Rethinking Systems for Longer Lives' दीर्घायुष्याचे युग: दीर्घ आयुष्यासाठी प्रणालींचा पुनर्विचार करणे वृद्धांचे समाजातील स्थान, त्यांचे योगदान आणि त्यांच्या समस्यांकडे जगाचे लक्ष वेधणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. वृद्धत्व हा आजार नसून,ती बालपण आणि तारुण्यासारखीच जीवनाची एक अत्यंत महत्त्वाची आणि सुंदर अवस्था आहे.वयाच्या एका विशिष्ट टप्प्यानंतर माणसाच्या शरीरात आणि मनात होणारा नैसर्गिक आणि क्रमिक बदल होय. जीवशास्त्राच्या दृष्टीने, ही एक अपरिवर्तनीय (पुन्हा मागे न फिरणारी) प्रक्रिया आहे.

आजच्या आधुनिक आणि गतिमान युगात एकत्र कुटुंब पद्धती मागे पडत चालली आहे. त्यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिकांना एकटेपणाचा सामना करावा लागत आहे. वृद्धत्वामध्ये आरोग्य ढासळणे, आर्थिक परावलंबित्व आणि मानसिक नैराश्य यांसारख्या गंभीर समस्या निर्माण होतात. अनेक ठिकाणी वृद्धांकडे दुर्लक्ष केले जाते किंवा त्यांना वृद्धाश्रमात पाठवले जाते, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.ज्येष्ठ नागरिक हे कोणत्याही कुटुंबाचा आणि समाजाचा मुख्य आधारस्तंभ असतात. त्यांच्याकडे



आयुष्याचा मोठा अनुभव आणि ज्ञान असते. त्यांनी आपल्या तारुण्यात कुटुंब आणि देशाच्या प्रगतीसाठी प्रचंड कष्ट घेतलेले असतात. आज आपण जे सुखी आयुष्य जगत आहोत, ते त्यांच्याच त्यागाचा परिणाम आहे. घरातील आजी-आजोबा लहान मुलांवर चांगले संस्कार करतात आणि संपूर्ण कुटुंबाला एकत्र बांधून ठेवतात. ते आपल्या संस्कृतीचे आणि मूल्यांचे रक्षक आहेत.वृद्धत्व दिवस हा केवळ एक दिवसाचा सोहळा नाही, तर ती एक आठवण आहे की आपण आपल्या वृद्धांची काळजी घेतली पाहिजे. त्यांना महागड्या भेटवस्तूंची नव्हे, तर आपल्या वेळेची,प्रेमाची आणि आदराची गरज असते. आपण त्यांच्याशी रोज संवाद साधला पाहिजे,त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे आणि त्यांना कधीही एकटे पडू दिले नाही पाहिजे.

वृद्धत्व हा निसर्गाचा नियम आहे आणि आज जे तरुण आहेत, ते उद्या वृद्ध होणार आहेत. त्यामुळे आज आपण आपल्या ज्येष्ठांना जो आदर देऊ, तोच उद्या आपल्यालाही मिळेल. चला,ज्यांनी आपल्याला चालायला शिकवण्यासाठी स्वतःची पाठ वाकवली, त्यांच्या वृद्धत्वात त्यांचा पाठीचा कणा बनणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.लहानपण आणि वृद्धत्व यात फारसा फरक नसतो, दोन्हींनाही फक्त प्रेमाची आणि एका हाताच्या आधाराची गरज असते. या वृद्धत्व दिनी आपण सर्वजण प्रतिज्ञा करूया की,आपल्या घरातील आणि समाजातील प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाचा आपण नेहमी आदर करू,त्यांना प्रेम देऊ आणि त्यांचे आयुष्य सुसह्य व आनंदी बनवू.

**डॉ. विनोद पवार**
९४२३४ ३३४५३

# राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस

विज्ञान आणि तंत्रज्ञानाने आज खूप प्रगती केली आहे. आपण कृत्रिम उपग्रह, रोबोट्स तयार केले, पण आजही वैज्ञानिक प्रयोगशाळेत मानवी रक्ताचा एकही थेंब तयार करू शकलो नाही. मानवी शरीरात रक्ताला कोणताही पर्याय उपलब्ध नाही. रक्ताला फक्त एकच पर्याय आहे, तो म्हणजे 'मानवाने मानवासाठी केलेले रक्तदान'.त्यामुळे अपघाताच्या वेळी, प्रसूतीच्या वेळी माता भगिनी,शस्त्रक्रियेदरम्यान, हिमोफिलिया, थॅलेसेमिया आणि कॅन्सरसारख्या गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी केवळ मानवी रक्तच उपयोगी पडते.आपल्या देशात आजही रक्ताची मागणी आणि पुरवठा यामध्ये मोठी तफावत आहे. वेळेवर रक्त न मिळाल्यामुळे दरवर्षी अनेक रुग्णांना आपले प्राण गमवावे लागतात. जर देशातील निरोगी तरुणांनी नियमितपणे स्वेच्छेने रक्तदान केले, तर रक्त पेढी / ब्लड बँकांमध्ये रक्ताचा कधीही तुटवडा जाणवणार नाही आणि प्रत्येक गरजू रुग्णाचे प्राण वाचू शकेल.भारतात रक्ताची टंचाई दूर करणे आणि लोकांना ऐच्छिक रक्तदानासाठी प्रवृत्त करणे साठी १ ऑक्टोबर १९७५ पासून भारतात राष्ट्रीय स्वैच्छिक रक्तदान दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली.जेव्हा एखादा रुग्ण मृत्यूशी झुंज देत असतो, तेव्हा त्याला मिळालेला रक्ताचा एक थेंब केवळ त्याचे प्राण वाचवत नाही, तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाला जगण्याची एक नवी उमेद देतो.



याच भावनेला अधोरेखित करण्यासाठी या वर्षाची मध्यवर्ती संकल्पना 'गिव्ह ब्लड,गिव्ह होप : टुगेदर वुई सेव्ह लाइव्हज '(रक्त द्या, आशा द्या: एकत्र मिळून आपण आयुष्य वाचवू या)' यावर आधारित आहे. या थिमनुसार-एकत्रित पाऊल (एकत्र मिळून) हा शब्द समाजातील सामूहिक शक्ती दर्शवतो. रक्ताचा तुटवडा केवळ एक व्यक्ती दूर करू शकत नाही, तर संपूर्ण समाजाने, विशेषतः तरुण पिढीने एकत्र येऊन रक्तदान चळवळ राबवणे गरजेचे आहे.जात, धर्म, पंथ या पलीकडे जाऊन जेव्हा लोक एकत्र येऊन रक्तदान करतात, तेव्हा ते सामाजिक एकात्मतेचे एक उत्तम उदाहरण बनते.रक्तदान हे केवळ एक शारीरिक कर्तव्य नसून ती एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला दिलेला आशेचा किरण आहे.

रक्तदान करण्यासाठी नियम :१. व्यक्तीचे वय १८ ते ६५ वर्षे दरम्यान असावे.२. त्याचे वजन किमान ५० किलो असावे.३. शरीरातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमीत कमी १२.५ ग्रॅम असावे.४. रक्तदात्याला कोणताही गंभीर संसर्गजन्य आजार नसावा. अशी व्यक्ती सुरक्षितपणे रक्तदान करू शकते.नियमित रक्तदानामुळे शरीरातील लोहाचे ( आयर्न) प्रमाण नियंत्रित राहते, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो.रक्तदान हे समाजात 'सर्वांच्या रक्ताचा रंग एकच आहे' या मूल्याची आणि बंधुभावाची आठवण करून देते. रक्तदान केल्यानंतर, मिळालेले रक्त सहसा लाल रक्तपेशी, प्लेटलेट्स आणि प्लाझ्मा अशा तीन वेगवेगळ्या घटकांमध्ये विभागले जाते. हे घटक गरजेनुसार वेगवेगळ्या तीन रुग्णांना दिले जाऊ शकतात, ज्यामुळे एकाच रक्तदानातून तिघांचे प्राण वाचण्यास मदत होते. हृतिक रोशनचे रक्त अत्यंत दुर्मिळ (रेअर ब्लड ग्रुप- बी निगेटिव्ह) आहे. तो नियमितपणे रुग्णालयात जाऊन रक्तदान करतो. वेळेवर मिळालेले रक्त एखाद्या व्यक्तीला मृत्यूच्या दारातून सुखरूप बाहेर आणू शकते. आपल्या रक्ताचा एक थेंब,रुग्णाच्या आयुष्याला आशेचा दिवा देतो, तेव्हा..रक्तदानाचे महान पर्व, हेच आपले राष्ट्रीय कर्तव्य हे ध्यानात ठेवून माणुसकी जपण्यासाठी पाऊल पुढे टाकू या!

**तारा शर्मा**

## संक्षिप्त



### लेखिका रंजना कराळे यांचा सत्कार

**अमरावती-** विदर्भ साहित्य संघ आपल्या दारी या अमरावती शाखेच्या अभिनव उपक्रमाअंतर्गत लेखिका रंजना कराळे यांचा 'झिली' हा कथासंग्रह नुकताच प्रकाशित झाल्याबद्दल विदर्भ साहित्य संघ अमरावती शाखेतर्फे त्यांचे घरी जाऊन बुके,शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. लेखिका रंजना कराळे या अमरावती जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कवयित्री,गजलकार व उत्तम संचालिका असून त्या महाराष्ट्रातील सर्जनशील शब्दवेल साहित्य संघाच्या केंद्रीय उपाध्यक्षा आहेत. 'मैत्रगंध' हा त्यांचा कवितासंग्रह प्रकाशित असून त्यानंतर 'झिली' हा कथासंग्रह त्यांचे दुसरे प्रकाशन आहे.विदर्भ साहित्य संघ अमरावती शाखेचे अध्यक्ष डॉ. श्यामसुंदर निकम, सचिव आबासाहेब कडू, उपाध्यक्ष दीपक दारव्हेकर, प्रसिद्धी विभाग प्रमुख विशाल कन्हेरकर, गजाननराव कराळे इ.उपस्थित होते. या सत्कार सोहळ्यास डॉ. शोभा रोकडे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची विशेष उपस्थिती लाभली. याप्रसंगी विदर्भ साहित्य संघ अमरावती शाखेचे अध्यक्ष डॉ.श्यामसुंदर निकम यांनी लेखिका रंजना कराळे यांना पुढील साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्यात.



### स्वच्छता व प्लास्टिकमुक्त परिसरासाठी तपासणी मोहीम

**अमरावती-**अमरावती महानगरपालिकेच्या वतीने शहरातील स्वच्छता तसेच प्लास्टिकमुक्त परिसरासाठी जनजागृती व तपासणी मोहीम राबविण्यात आली. अंबादेवी मार्केट व गांधी चौक परिसरात राबविण्यात आलेल्या या मोहिमेदरम्यान प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिकचा वापर, विक्री व साठवणूक तसेच परिसरातील स्वच्छतेची पाहणी करण्यात आली. गुप्ताजी यांच्यावर ५००, योगेश स्टोअर्स यांच्यावर १,०००, पूजा बांगलस यांच्यावर ५००, रोशन गुप्ता (दूध डेअरी) यांच्यावर१,०००, तर संजय इंगोले यांच्यावर १,००० असा दंड आकारण्यात आला. या कारवाईत एकूण ४,००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. या मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक श्रीकांत डवरे, स्वास्थ्य निरीक्षक मिथुन उसरे, धनिराम कलोसे, सचिन सैनी व मिथुन वाघमारे यांच्यासह महानगरपालिका कर्मचारी सहभागी झाले.



### पोटे पाटील आयुर्वेद महाविद्यालयात आयुर्वेद दिन

**अमरावती-**पी.आर.पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस, आयुर्वेद, अमरावती येथे ११ वा आयुर्वेद दिन विविध उपक्रमांनी ३ दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आयुर्वेदाच्या शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार आणि दैनंदिन जीवनात आयुर्वेदिक जीवनशैलीचा अंगीकार करण्याबाबत जनजागृती करण्यात आली. या संपूर्ण उपक्रमाचे नोडल अधिकारी डॉ. स्वाती धामणिकर व सचिव डॉ.मनोदय मोहोड यांनी नियोजन व समन्वय केला. प्राचार्य डॉ. रणजित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागांच्या सहकार्याने आयुर्वेद दिनाचे विविध कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडले.

# महापारेषणमधील प्रलंबित प्रश्नांवर इंटक फेडरेशनचे आंदोलन

## प्रशिक्षण खर्च, भरती-पदोन्नतीतील अनियमितता व आरक्षणाच्या प्रश्नांवर चौकशीची मागणी; प्रशासनासोबत बैठकीचे आश्वासन

**आसेगाव पूर्णा/ वार्ताहर**

महापारेषणमधील प्रशिक्षण खर्च, भरती-पदोन्नतीतील कथित अनियामितता, आरक्षण, सेवाज्येष्ठता तसेच कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय वीज कामगार फेडरेशन (इंटक)च्या वतीने मंगळवारी २९ सप्टेंबर प्रकाशगंगा, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आंदोलन करण्यात आले.

सन २०२६-२७ मधील ३० कोटी रुपयांचे प्रशिक्षण बजेट, १५.६१ कोटी रुपयांच्या नऊ ट्रेनिंग वर्क ऑर्डर, कोटेशन पद्धतीचा अवलंब तसेच प्रतिअधिकारी, प्रतिदिन सुमारे १४ हजार रुपये प्रशिक्षण खर्चाच्या मुद्द्यांची स्वतंत्र, निष्पक्ष व सखोल चौकशी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती, कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रकल्पग्रस्तांना सेवेत सामावून घेणे, सहायक अभियंता पदाच्या भरती प्रक्रियेतील प्रश्न तसेच नियोजित सल्लागार नियुक्तीसह इतर प्रलंबित कामगार प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची मागणीही संघटनेने केली.



आंदोलनादरम्यान प्रशासनाने प्रलंबित व सध्याच्या विविध प्रश्नांवर आ.जगताप यांच्या उपस्थितीत लवकरच बैठक घेण्याचे मान्य केल्याची माहिती संघटनेने दिली. या आंदोलनात मुख्य महासचिव प्रकाश गायकवाड, उपाध्यक्ष व मुख्य प्रवक्ते राकेश जाधव, कार्याध्यक्ष दामोदर चंगोले, उपमुख्य महासचिव रफिक शेख, केंद्रीय महासचिव प्रकाश ठाकरे, केंद्रीय महासचिव दिगंबर कटरे, उपाध्यक्ष नितीन करडे, सचिव खुशाल मसराम, उपाध्यक्ष अनिल गोरे, सहसचिव अविनाश जावरे यांच्यासह इंटक फेडरेशनचे विविध युनिटचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. तसेच प्रकल्पग्रस्त, सफाई कामगार उमेदवार, विद्युत अभियांत्रिकी पदवीधारक व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्जबाजारी व नापिकीला कंटाळून शेतकऱ्यांनी विष घेऊन आत्महत्या

**मोशी/ वार्ताहर**

मोर्शी तालुक्यातील शिरखेड पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असलेल्या कोळविहीर येथील शेतकरी एकनाथ गोवर्धन गतफने वय ३८ वर्ष यांनी कर्जबाजारी व नापिकाला कंटाळून विष घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली.

स्व.एकनाथ त्यांच्याकडे वडिलोपार्जित १८ एकर शेती असून यंदाच्या खरीप हंगामात सदर शेतकऱ्यांनी सोयाबीन, कपाशी, तूर इत्यादी पिकाची खरीप हंगामात लागवड केली होती. वरूण राजा ने डोळे वटारल्याने सोयाबीन पिकाचे पाण्याअभावी पिवळी पडू लागली होती.

बँकेचे कर्ज तसेच नातेवाईका कडून उसनवार घेतलेली रक्कम त्यांना कसे परत करावे या विचारत असताना एकनाथ गतफणे याने स्वतःच्या शेतात विष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना मंगळवार २९ सप्टेंबर रोजी दुपारी ५ वाजता च्या दरम्यान घडली. या बाबतची माहिती शिरखेड पोलिसांना मिळताच शिरखेड पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा करून मृतक शेतकरी चा मृतदेह चांदुर बाजार ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदना करिता पाठविण्यात आला होता. बुधवारी सकाळी मृतक शेतकऱ्यांच्या मृतदेह वर शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला होता. मृतक शेतकरी एकनाथ हा एकुलता एक मुलगा होता. त्याचे दोन वर्षांपूर्वी विवाह सोहळा पार पडलेला होता. मृतक शेतकऱ्यांच्या मागे आई-वडील, पत्नी, एक लहान मुलगा असाच शोकाकुल परिवार आहे. याप्रकरणी शिरखेड पोलिसांनी मर्ग दाखल केला असून पुढील तपास करीत आहे.



# तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत विद्यानिकेतन शाळेचे यश

**कुऱ्हा/ वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागांतर्गत, जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत 'विद्यानिकेतन व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालय, कुऱ्हा' येथील विद्यार्थ्यांनी उत्तुंग कामगिरी बजावली आहे. १४, १७ व १९ वर्षांखालील मुले तसेच १९ वर्षांखालील मुली या चारही प्रकारांत विजेतेपद पटकावत शाळेच्या संघांनी वर्चस्व गाजवले. या चारही विजेत्या संघांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १४ वर्षांखालील मुले: कार्तिक सहारकर, नैतिक टेटू, आलेख पत्रे, दर्शन दळवी, विघ्नेश निस्ताने, अश्विन लीलव्हें,



राम घुले, सोहम मेश्राम, तन्मय मरोडकर, रुद्र जैतवार.१७ वर्षांखालील मुले: दानिश शाह,अथर्व बिंड, प्रथमेश इंगोले, वैष्णव इखार, साहिल दातीर, रुद्र चामरे, शौर्य डहाके, सिद्धार्थ निस्ताने, वेदांत वैद्य, शेख अरमान.१९ वर्षांखालील मुले: दीप सोनवणे, चैतन्य गिरी, मोहम्मद जिशान, शेख शफी, मंथन साठवणे, प्रथमेश पोकळे, रणजीत सहारे, आदित्य असोले, केविन राठोड.१९ वर्षांखालील मुली: सानिका तेटू, प्रीती देशमुख, सेजल पटले, दिव्या झरपुरे, सानिका कडू, महेक पासरे, आचल बेहरे, श्रावणी मेश्राम, सुहानी वाढोणकार. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाचे पालक संचालक प्रकाशदादा मक्रमपूरे, शाळा समिती सदस्य सुरेंद्र सोहळे, मुख्याध्यापक दिनेश सवाई, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे मनापासून अभिनंदन केले असून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अमरावती विभागातील धरणात ६२.६८ टक्के उपयोगी जलसाठा

## अमरावतीच्या मध्यम परियोजनेत ५९.४७ टक्के साठा,सिंचन विभागाकडून माहिती

**अमरावती/ का.प्र.**

अमरावती विभागातील २८७मोठ्या, मध्यम आणि लघु सिंचन प्रकल्पांत एकूण ३१०२.४४ दलघमी उपयुक्त जलसाठा क्षमतेपैकी १९४४.६४ दलघमी पाणी उपलब्ध असून ६२.६८ टक्के लाठा नोंदविण्यात आला आहे. २९ सप्टेंबरच्या सकाळी ८ वाजताच्या स्थितीनुसार मध्यम प्रकल्पांत ६८.४८ टके, मोठ्या प्रकल्पांत ६०.०७ टक्के आणि लघु प्रकल्पांत ६१.८० टक्के पाणी आहे. अमरावती जिल्ह्यातील प्रमुख प्रकल्पांत ५८.९० टक्के साठा आहे. सात मध्यम प्रकल्पांत ५९.४७ टक्के पाणी असून शहानूरमध्ये ७५.६७, बंद्रभागेत १६.९६, पूर्णत ९६.१४, सपनात ७३.७६ आणि बोडों नहर प्रकल्पात १६.५८ टके साठा आहे. चंद्रभागा आणि पूर्णा प्रकल्पांचे दरवाजे बंद करण्यात आले आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील तीन प्रमुख प्रकल्पांत ६८.२० टक्के पाणी असून सात मध्यम प्रकल्पांत ८४.२२ टक्के माठा आहे. अर्धापूरमध्ये ८१.२७, सायखेडा, गोकी, वायादी आणि बोरगाव प्रकल्पांत १०० टक्के साठा नोंदला आहे अकोला जिल्ह्यातील दोन प्रमुख प्रकल्पांत ५६.७० टक्के, तर चार मध्यम प्रकल्पांत ५३.३६ टंक साठा आहे.

वाशिमच्या सोनल आणि एकबुर्जी प्रकल्पांत मिळून ३१.९१ टक्के पाणी उपलब्ध आहे. आहे. बुलडाणा जिल्ह्यातील तीन प्रमुख प्रकल्पांत ४९.३४ टक्के साठा असून साप्त मध्यम प्रकल्पांत ७५.१५ टक्के पाणी आहे. नळगंगा ८०.८९, पेनटाकळी ८०.९८ तर खडकपूर्णत ५.६० टके साठा आहे. सिंचन विभागाकडून धरणसाठ्याचा दररोज आढावा घेतला जात असून कमी साठा असलेल्या प्रकल्पांवर विशेष लक्ष ठेवले जात आहे.

धरणसाठ्यावर सिंचन विभागाची रोज नजर अमरावती विभागातील २८७ प्रकल्पांत सध्या ६२.६८ टक्के उपयुक्त जलसाठा आहे. मध्यम प्रकल्पांत ६८.४८ टक्के पाणी उपलब्ध असल्याने स्थिती तुलनेने चांगली आहे. मात्र वाशिममध्ये केवळ ३१.९१ टक्के साठा असून काही प्रकल्पांमध्ये पाण्याची कमतरता जाणवत आहे. त्यामुळे सिंचन विभागाकडून दररोज साठ्याचा आढावा घेतला जात आहे.

# विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभागाच्यावतीने कार्यशाळा

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभागाद्वारे डॉ. मोतीलालजी राठी जनस्वास्थ्यासाठी 'आरोग्य अंकुरे' या विषयावर १ ऑक्टोबर रोजी मोर्शी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, पार्डी येथे सकाळी ११ वाजता जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये पोषणविषयक जागृती निर्माण व्हावी, आरोग्यादायी जीवनशैलीबद्दल माहिती मिळावी, या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. गेल्या बावीस वर्षांपासून अशा प्रकारच्या कार्यशाळेचे दरवर्षी गृहविज्ञान विभागामार्फत आयोजन केले जात आहे हे विशेष. कार्यशाळेचे उद्घाटन नेरपिंगळाई येथील डॉ. प्रकाश राठी यांच्या हस्ते होणार असून समारंभाच्या अध्यक्षस्थानी गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय, विद्यापीठ व्य.प. सदस्य डॉ. मनिषा कोडापे,जि.प. शाळेचे मुख्याध्यापक नंदकिशोर धावडे,गावच्या सरपंच वर्षा वानखडे, उपसरपंच प्रवीण ठवळी यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. सर्व ग्रामस्थ तसेच मुला - मुलींनी या कार्यशाळेला उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# श्री क्षेत्र शेंदूरजना बाजार येथे २ व ३ ऑक्टोबरला संत अच्युत महाराज पुण्यतिथी महोत्सव

**तिवसा/ वार्ताहर**

श्री क्षेत्र बाजार येथे २ व ३ ऑक्टोबर रोजी समर्थ श्री संत अच्युत महाराज संस्थान यांच्या वतीने अच्युत महाराजांच्या १४ व्या पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी हभप श्रीकांत महाराज चांदूरबाजार यांच्या हस्ते 'श्री' चा अभिषेक व पादुका पूजन होईल.त्यानंतर सकाळी आठ ते दुपारी एक वाजेपर्यंत अच्युत स्तवन अमृत ग्रंथ प्रारंभ होईल.यावेळी संतकवी दादासाहेब टोपले यांची प्रमुख उपस्थित राहील तर नलिनी दुर्गादास चांदोरे, गोपाल खासबागे हे पारायणाचे ग्रंथ वाचन करेल. दुपारी तीन ते पाच वाजता अच्युत भजनावली हा कार्यक्रम सादर होईल.हा कार्यक्रम राजेंद्र सावरकर, ह.भ.प रायजीप्रभू शेलोटकर महाराज, देवाशी मुळे, [illegible] निमकर,अक्षया भेलकर, मैथिली काळे,एकनाथ देवळे, अर्पण निमकर, कृष्णा निमकर, राम निमकर व संच सादर करेल.



यावेळी ज्ञानेश्वरी प्रवचनांचा कार्यक्रम ह.भ.प सचिन देव महाराज हे सादर करतील. ३ ऑक्टोंबर रोजी सकाळी पाच ते सहा वाजता प्रातःध्यान, सकाळी सहा ते आठ वाजता श्री ची मिरवणूक, सकाळी आठ ते दहा वाजेपर्यंत संत अच्युत महाराजांच्या महानिर्वाणपर जीवन दर्शनाचा कार्यक्रम होईल.या कार्यक्रमाला जगद्गुरु राजेश्वर माऊली सरकार,संत शंकर महाराज, हिमालय तपस्वी अशोकानंदजी कवर महाराज, श्री संत दुर्गामाता, आचार्य जितेंद्रनाथ महाराज, संत सयाजी महाराज,ह.भ.प सचिन देव महाराज उपस्थित राहतील. त्यानंतर 'संतबोध' या त्रैमासिक अंकाचा प्रकाशन सोहळा होईल. या कार्यक्रमाला राज्यसभा खा.अनिल बोंडे, खा.बळवंत वानखडे, विधानपरिषद चे आ. प्रवीण पोटे, तिवसाचे आ.राजेश वानखडे, अमरावतीच्या आ. सुलभा खोडके, आ. संजय खोडके, माजी खा.नवनीत राणा, बडनेरा चे आ.रवी राणा, माजी आ.ॲड यशोमती ठाकूर, विधानपरिषद आ.बच्चू कडू उपस्थित राहतील व याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करतील. त्यानंतर दुपारी २ वाजता काला व महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. हा कार्यक्रम ह भ प वाणीभूषण कनेरकर महाराज व संच सादर करेल. सायंकाळी साडेसात वाजता सामुदायिक प्रार्थना होईल. या दोन दिवसीय संपूर्ण कार्यक्रमाला भाविकांनी उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन श्री संत अच्युत महाराज संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ.सुधीर केने यांना 'मास कम्युनिकेशन आणि जर्नलिझम'मध्ये मानद डॉक्टरेट

**अमरावती/ का.प्र.**

शिक्षण, पत्रकारिता, संशोधन आणि सामाजिक क्षेत्रात तब्बल तीन दशकांहून अधिक काळ उल्लेखनीय योगदान देणारे ज्येष्ठ पत्रकार व शिक्षक डॉ. सुधीर पंजाबराव केने यांना 'नालंदा नीर्क युनिव्हर्सिटी, इंडिया' यांच्याकडून 'मास कम्युनिकेशन आणि जर्नालिझम' विषयातील मानद डॉक्टरेट जाहीर करण्यात आली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची आणि पत्रकारिता व जनसंवाद क्षेत्रातील योगदानाची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.



२९ सप्टेंबर रोजी मानद डॉक्टरेटची अधिकृत घोषणा करण्यात आली. नालंदा ऑनलाइन इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट अँड रिसर्च सेंटरद्वारे संचालित या संस्थेच्या वतीने जारी करण्यात आलेल्या प्रमाणपत्रावर विद्यापीठाचे कुलपती डी. जाधव, कुलगुरू तसेच कुलसचिव डॉ. किशोर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.डॉ. केने यांचा पत्रकारितेतील ३४ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असून, गेल्या २३ वर्षांपासून ते अध्यापन क्षेत्रात कार्यरत आहेत. पत्रकारितेसोबतच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सामाजिक जडणघडणीतही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

डॉ. केणे यांच्या लेखणीतून आतापर्यंत चार पुस्तके प्रकाशित झाली असून, त्यांच्या एका पुस्तकाला राष्ट्रपतींचे गौरवपत्र प्राप्त झाले आहे. पत्रकारिता आणि साहित्य क्षेत्रातील त्यांच्या कार्याची ही महत्त्वपूर्ण दखल मानली जाते.दूरदर्शनवरील विविध कार्यक्रमांमध्ये त्यांनी सहभाग नोंदविला असून, विविध विषयांवर आकाशवाणीवर त्यांच्या मुलाखती प्रसारित झाल्या आहेत.ते जिल्हा पत्रकार संघाचे सदस्य असून सहयोग फाउंडेशनचेही सदस्य म्हणून सामाजिक क्षेत्रात योगदान देत आहेत. शिक्षण आणि पत्रकारिता या दोन्ही क्षेत्रांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या डॉ.सुधीर केने यांना मिळालेल्या मानद डॉक्टरेटमुळे त्यांच्या कार्याचा गौरव झाला असून, त्यांच्या या सन्मानाबद्दल पत्रकारिता, राजकीय,शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे.

# पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालयात नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ उत्साहात

**अमरावती/ का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७मधील नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा दीक्षारंभ कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल ठाकरे,उपप्राचार्य नितेश चौधरी, शिक्षण विभाग प्रमुख गजानन अढाऊ तसेच अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अर्चना त्रिपाठी विद्यार्थी, पालक व महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात 'हीच आमची प्रार्थना' या प्रार्थनेने करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक निलेश राठोड, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना स्मार्ट ध्येय कसे निश्चित करावे व ते साध्य करण्यासाठी प्रभावी नियोजन कसे करावे, याबाबत मार्गदर्शन केले.महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनिल ठाकरे यांनी नवप्रविष्ट विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली,तसेच त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे उपप्राचार्य नितेश चौधरी यांनी माजी विद्यार्थ्यांच्या यशोगाथा विद्यार्थ्यांसमोर मांडत त्यांच्या करिअरच्या दृष्टीने मार्गदर्शन केले. तसेच शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा.गजानन आढाऊ यांनी चार वर्षीय पदवी अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.

यावेळी विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाचे महत्त्व, महाविद्यालयातील विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रम तसेच कृषी क्षेत्रातील भविष्यातील संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे संचालन प्रा. राहुल कळसकर यांनी केले तर आभार प्रा.श्वेता देशमुख यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, अंतिम वर्षातील विद्यार्थी यांनी मेहनत घेतली. दीक्षारंभ कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये ध्येयनिश्चिती ,आत्मविश्वास आणि कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्याची प्रेरणा निर्माण झाली. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

# शिराळा फाटा रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तात्काळ करा

## युथ परिवर्तन फाउंडेशनचे सा.बांधकाम विभागाला निवेदन

**शिराळा/ वार्ताहर**

शिराळा फाटा या रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी, या मागणीसाठी युथ परिवर्तन फाउंडेशनच्या वतीने आज सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती येथे निवेदन देण्यात आले.सदर रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. या मार्गावर शाळकरी विद्यार्थ्यांची दररोज मोठ्या प्रमाणात ये-जा असते. रस्त्याची खराब अवस्था आणि खड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून अपघाताचा धोका वाढला आहे. यापूर्वीही रस्त्याच्या दुरुस्तीबाबत संबंधित विभागाकडे मागणी करण्यात आली होती.



मात्र, अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ रस्त्याची पाहणी करून खड्डे बुजविण्यासह आवश्यक दुरुस्तीचे काम सुरू करावे, अशी मागणी फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली.रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तात्काळ सुरू करण्यात आले नाही, तर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला.यावेळी युथ फाउंडेशनचे सत्यजित नितवणे रोहित झाकर्डे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# नागपूरातील इसमाची निर्घृण हत्या

## दोन विधीसंघर्षित बालके पोलिसांच्या ताब्यात

### खल्लार येथील मुख्य बाजार चौकातील घटना







**खल्लार/प्रतिनिधीः-** येथील मुख्य बाजार चौकात दोन विधीसंघर्षित बालकांकडून ४२ वर्षीय इसमाची चाकू भोसकून निर्घृणपणे हत्या केल्याची धक्कादायक घटना आज बुधवारी (दि.३०) सकाळी अकरा वाजताच्या सुमारास घडली. खल्लार गावातील मुख्य चौकात घडलेल्या या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

नईम शहा तुराब शहा (वय ४२) रा. गिट्टी खदान नागपूर असे मृत इसमाचे नाव असून मृतक हा मागील चार महिन्यापासून खल्लार येथील समिना परविन अमिन शहा या महिलेच्या घरी राहता होता.ज्या महिलेच्या घरी मृतक चार महिन्यापासून राहत होता त्या समिना परविनचा पती अमिन शहा याला मृतक मारहाण करीत असल्याची माहिती समोर आली आहे तसेच मृतक व पत्नीच्या रागावर अमिन शहा हा घरून निघून गेल्याचेही समजते.

दरम्यान आज दोन विधीसंघर्षित बालकांनी सिनेस्टाईल पद्धतीने मुख्य बाजार चौकात निर्घृणपणे सिनेस्टाईल हत्या केली. त्यानंतर घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.याप्रकरणी खल्लार पोलिसांनी दोन्ही विधीसंघर्षित बालकांना ताब्यात घेतले असून हत्या कोणत्या (पान २ वर)

# पत्नी आणि मुलांना जिवंत जाळण्याचा पतीचा प्रयत्न

## खिडकीतून ज्वलनशील पदार्थ टाकून आग लावल्याचा आरोप

### नंदीपुरा परिसरातील धक्कादायक घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नंदीपुरा परिसरात एक महिला आणि तिच्या दोन अल्पवयीन मुलांना घरात जिवंत जाळून मारण्याचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रात्रीच्या वेळी घराला बाहेरून आग लावल्याचा आरोप असून, सुदैवाने वेळेत मदत मिळाल्याने महिला आणि तिच्या दोन्ही मुलांचे प्राण वाचल्याचे सांगण्यात येत आहे.

माहितीनुसार, टीनाली गोळे नामक महिला आपल्या ७ वर्षीय मुली आणि १४ वर्षीय



मुलासोबत नंदीपुरा परिसरात भाड्याच्या घरात राहत होत्या. टीनाली गोळे आणि त्यांचे पती अमोल गोळे यांच्यात कौटुंबिक वाद असल्याचे सांगण्यात येत असून, दोघांमध्ये घटस्फोटाची केस सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.घटनेच्या रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास अमोल गोळे हा कथितारित्या घराजवळ आला,असा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर त्याने खिडकीतून घरात पेट्रोलसदृश ज्वलनशील पदार्थ टाकला आणि घराचा दरवाजा बाहेरून बंद करून आग लावल्याचा आरोप आहे.या संपूर्ण घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले असून, ३० सप्टेंबरच्या रात्री १२:२० (पान २ वर)

# फॉल्टी मीटरच्या नावाखाली ग्राहकांची लूट

## सरासरी बिलाचा भुर्दंड,स्मार्ट मीटरसाठी दबावाचा आरोप

### तक्रारीकडे दुर्लक्ष होत असल्याने ग्राहक संतप्त

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** मीटर फॉल्टी असल्याचे कारण पुढे करून वीज ग्राहकांना वाढीव सरासरी बिलांचा भुर्दंड सहन करावा लागत असल्याचा आरोप होत आहे. नियमितपणे वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांच्या फॉल्टी मीटरच्या वापराची सरासरी मुख्य कार्यालयीन स्तरावर वाढविल्याने बिल दुप्पट-तिप्पट होत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. त्यामुळे वीज वितरण कंपनीच्या कारभाराविरोधात ग्राहकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

फॉल्टी मीटरच्या बिलात दुरुस्ती करण्यासाठी असलेला पर्याय सध्या बंद असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. परिणामी, प्रत्यक्ष वीजवापरापेक्षा जास्त रकमेचे बिल आले तरी ते भरल्याशिवाय पर्याय राहत नसल्याची तक्रार आहे. काही ग्राहकांनी कार्यालयात धाव घेऊन तक्रारी केल्या असता, 'स्मार्ट



मीटर बसवल्यानंतरच बिल दुरुस्त होईल', असे सांगितले जात असल्याचा आरोप आहे. त्यामुळे स्मार्ट मीटर बसविण्यासाठी ग्राहकांवर अप्रत्यक्ष दबाव आणला जात असल्याची चर्चा आहे.

**दुष्काळात वाढीव बिलांचा भार-** बिल न भरल्यास वीजपुरवठा खंडित करण्यासाठी कर्मचारी घरी येत असल्याने नाईलाजाने वाढीव बिले भरावी लागत असल्याचे ग्राहक सांगतात. विशेषतः जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती असताना हा अतिरिक्त आर्थिक भार असह्य ठरत असल्याची भावना आहे.या संपूर्ण प्रकाराची उच्चस्तरीय चौकशी करून फॉल्टी मीटरची बिले तत्काळ दुरुस्त करावीत, अशी मागणी (पान २ वर)

# आमरण उपोषणाला बसलेल्या पीडित महिलेची प्रकृती खालावली

## पोलिस बंदोबस्तात रुग्णवाहिका उपोषणस्थळी दाखल

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर तालुक्यातील कविठा बु.ग्रामपंचायत कार्यालयातील तक्रार निवारण शिबिरादरम्यान महिलेला मारहाण, जातीवाचक व अपमानास्पद शिवीगाळ प्रकरणात पीडित महिलेने सुरू केलेल्या आमरण उपोषणाने गंभीर वळण घेतले आहे. उपोषणाच्या दहाव्या दिवशी प्रकृती खालावल्याने पोलिसांचा बंदोबस्त आणि रुग्णवाहिकेसह पथक




उपोषणस्थळी दाखल झाले. मात्र,वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष विनोद नरवरे आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष किशोर मोहोड यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिणामी पोलिसांनी पीडित महिलेला ताब्यात घेतले नाही. व ॲम्ब्युलन्स परत पाठवली. पीडित महिलेने या प्रकरणातील उर्वरित पाच आरोपींविरुद्धही एफआयआर मधिल गुन्ह्यात समाविष्ट करावे, तसेच दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी अचलपूर येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले (पान २ वर)

# कोयत्यासह फिरणारा तरुण पोलिसांच्या ताब्यात

## फ्रेजरपुरा परिसरात अँटी गुंडा स्क्वॉडची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** सार्वजनिक ठिकाणी धारदार कोयता घेऊन फिरणाऱ्या २० वर्षीय तरुणाला अँटी गुंडा स्क्वॉडने ताब्यात घेतले. विश्राम भवन ते जेलकडे जाणाऱ्या मार्गावर बुधवारी ही कारवाई करण्यात आली. यश ऊर्फ चारू चरणदास मेश्राम (वय २०, रा. भीम ज्योती मंडळ, फ्रेजरपुरा) असे ताब्यात घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, अँटी गुंडा स्क्वॉडचे पथक गस्तीवर असताना मेश्राम हा संशयास्पदरीत्या फिरताना दिसला. त्याच्या हालचालींकडे पथकाने लक्ष ठेवले. त्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन पंचांसमक्ष झडती घेतली. झडतीदरम्यान त्याच्याकडे धारदार कोयता आढळून आला. पोलिसांनी शस्त्र जप्त केले. सार्वजनिक ठिकाणी कोयता बाळगण्यामागील उद्देशाबाबत त्याची चौकशी करण्यात येत आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात आर्म्स ॲक्टच्या कलम ४ व २५ तसेच महाराष्ट्र पोलिस अधिनियमाच्या कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील कारवाईसाठी आरोपीला फ्रेजरपुरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलीस (पान २ वर)

# दुसऱ्या दिवशी ४० नामांकनाची उचल

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी आज बुधवार ३० सप्टेंबर रोजी दुसऱ्या दिवशी भाजप नेते चंद्रशेखर उर्फ शेखर भोयर आणि त्यांची पत्नी सोनाली भोयर, गाजी मोहम्मद जाहेरोश, प्रा. अनिल काळे, सुरेश देवकर, संदीप इंगोले, प्रा. प्रशांत दिघे यांच्यासह १९ उमेदवारांनी आज ४० नामांकन अर्ज उचलले आहेत.दुसऱ्या दिवशीही एकाही उमेदवाराने आपले नामांकन दाखल केले नाही. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या कक्ष क्रमांक २ मध्ये विशेष निवडणूक कक्ष तयार करण्यात आला असून, तेथेच




### शिक्षक मतदारसंघ निवडणूकः

निवडणूक अधिकाऱ्यांसमोर नामांकन सादर करायचे आहे. बुधवारी अविनाश मधुकर बोर्डे अकोला - ३, चंद्रशेखर मनोहर भोयर अमरावती- २, सोनाली चंद्रशेखर भोयर अमरावती - २, गाजी मोहम्मद जाहेरोश अमरावती - २, संदीप मधुकर इंगोले अमरावती - २, सुरेश बाबूराव देवकर बुलडाणा - २, त्रिशूळ विनायक बोंबडे अमरावती - २, नागेश गोळे अंजनगाव सुर्जी - २, प्रा. अनिल काळे अमरावती - २, प्रा. विवेक शरदचंद्र देवरे बुलडाणा - २, भरत ओंकारराव काळमेघ अमरावती - २, दत्तात्रय श्रीराम लहाने बुलडाणा - ३, डॉ. प्रशांत विश्वेश्वर दिघे अमरावती - ३, सजील खान खलील खान अमरावती - १, हेमलता दिलीप मुनोत-देवडा बडनेरा - ४, अभिजीत पाटील बुलडाणा - २, राजेश केचे वरूड - २, सैय्यद इरफान सैय्यद अमीर अमरावती - २. (पान २ वर)

# अवैध दारू विक्रीसह अमली पदार्थ सेवनावर गुन्हे शाखेची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरातील अवैध धंद्यांवर तसेच सार्वजनिक ठिकाणी अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याच्या सूचना पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी गुन्हे शाखेला दिल्या आहेत. त्यानुसार गुन्हे शाखा युनिट-२च्या पथकाने बुधवारी ३० सप्टेंबर रोजी विविध ठिकाणी कारवाई केली. गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील छत्रसालनगर आणि विलासनगर परिसरात अवैध देशी दारू विक्रीप्रकरणी तिघांविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये कारवाई करण्यात आली. त्यामध्ये शामलाल गणेश यादव (५०, रा. छत्रसालनगर), सतीश विजयराव पाटील (४१, रा. विलासनगर) आणि एका महिलेचा समावेश आहे. या कारवाईत ६ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दरम्यान, सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील उस्मानिया मशीद परिसरात सार्वजनिक ठिकाणी अमली पदार्थांचे सेवन (पान २ वर)

# अतिक्रमण कारवाई दरम्यान भिंत कोसळली, तिघे जखमी

### -मोर्शी-चांदूरबाजार मार्गावरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोर्शी ते परतवाडा आणि चांदूर बाजार महामार्गावर झालेल्या अतिक्रमणांवर आज बुधवार ३० सप्टेंबर रोजी कारवाई सुरू करण्यात आली आहे. मोर्शी-परतवाडा आणि चांदूर बाजार रस्त्यावर प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेल्या कारवाईदरम्यान, जेसीबी मशीनने दिलेल्या धक्क्यामुळे एक जीर्ण झालेली भिंत कोसळली.यामध्ये दोन पोलिस कर्मचारी आणि इतर एक व्यक्ती जखमी झाले. ही घटना बुधवारी दुपारी घडली.



जखमींमध्ये समीर चौधरी, गोपाल घाटे आणि नंदू या व्यक्तीचा समावेश आहे. समीर चौधरी यांच्या हाताला गंभीर दुखापत होऊन १५ टाके आले (पान २ वर)

# बकऱ्या चोरीचा गुन्हा उघडकीस -आरोपी ताब्यात, मुद्देमाल जप्त

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** पोलीस स्टेशन मंगरूळ दस्तगीर येथे दाखल असलेल्या बकऱ्या चोरीच्या गुन्ह्याचा सखोल तपास करून सदर गुन्हा उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी आदेशित केले होते. त्यानुसार पोलीस स्टेशन मंगरूळ दस्तगीर येथील अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्ह्याचा सखोल तपास सुरू केला.

तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी सुजल अमर सारसर (वय १९ वर्षे, रा. पुलगाव) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान आरोपीचे ताब्यातून चोरी गेलेला मुद्देमाल तसेच गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल जप्त करण्यात आली आहे.



सदर कारवाईमुळे बकऱ्या चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले असून, प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस (पान २ वर)

# शहरात १५ दिवस निर्बंध

### नवदुर्गोत्सव-शारदोत्सव पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी काढले आदेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहर आणि परिसरात आगामी नवदुर्गोत्सव आणि शारदोत्सवच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३६ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. हे आदेश १३ ऑक्टोबर, २०२६ रोजी पर्यंत लागू राहतील.

दि. ११ ऑक्टोबर, २०२६ रोजी घटस्थापना असून त्यादिवशी नवदुर्गोत्सव-शारदोत्सव तसेच नवरात्री उत्सवास प्रारंभ होणार आहे. त्याचप्रमाणे पोलीस आयुक्त अमरावती कार्यक्षेत्रामध्ये दुर्गादेवी व शारदादेवींची मोठ्या प्रमाणात स्थापना करण्यात येणार असून स्थापना मिरवणुकींचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात येणार आहे. तसेच अंबादेवी-एकविरादेवी मंदीर परिसरात भव्य यात्रेचे आयोजन करण्यात येत असून श्री अंबादेवी-एकविरादेवी मंदीरात दर्शनाकरीता दररोज ९ दिवस भाविकांची विशेषत: महिला वर्ग यांची प्रचंड गर्दी राहते. तसेच नवरात्री दरम्यान दररोज विविध ठिकाणी रास गरबा, दांडिया नृत्याचे आयोजन सुध्दा करण्यात येणार आहे.

या आदेशानुसार, अमरावती पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील सर्व पोलीस ठाण्यांच्या अंमलदारांना व वरिष्ठ अधिकाऱ्यांना (पान २ वर)

# सहा जणांवर संघटित गुन्हेगारीचे कलम

### परतवाडा पोलिसांची कारवाई

**परतवाडा/प्रतिनिधीः-** घरफोडीच्या गुन्ह्याचा तपास पुढे जात असताना सहा आरोपींचा संघटित गुन्हेगारी कारवायांशी संबंध असल्याचे समोर आल्याने परतवाडा पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम ११२ वाढविले आहे.

परतवाडा पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ५७९/२०२६ मध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (अ), ३३१(३) आणि ३३१(४) अन्वये तपास सुरू होता. तपासादरम्यान आरोपी संघटितरीत्या गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या कारवाईत अक्षय बाळू जुनघरे (वय ३१), श्रीरंग चंद्रचूड रत्नपारखी (वय ३०), आकाश ऊर्फ कोब्रा विनोद कंगाले (वय ३०), साहिल ऊर्फ बंटी बाळकृष्ण वाघपांजर (वय २३), प्रशिक संतोष (पान २ वर)

# दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांवर बँक अधिकाऱ्यांचा दबाव

## पीक कर्जासाठी शेतकऱ्यांवर विमा पॉलिसी लादण्याचा प्रयत्न

### -अंजनगाव सुर्जी एसबीआय शाखेत धक्कादायक प्रकार

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आधीच प्रचंड आर्थिक विवंचनेत आणि चिंतेत असताना, राष्ट्रीयीकृत बँकांकडून पीक कर्ज वाटपादरम्यान शेतकऱ्यांची अडवणूक होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. येथील स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) शाखेत कर्ज मंजूर झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने बँकेत बोलावून त्यांच्यावर विमा पॉलिसी घेण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.



प्राप्त माहितीनुसार, ज्या शेतकऱ्यांचे तीन ते चार लाख रुपयांचे पीक कर्ज मंजूर झाले आहे, अशा शेतकऱ्यांना बँकेच्या वतीने फोन करण्यात आले. 'तात्काळ आधार कार्ड घेऊन बँकेत या,' अशी बतावणी अधिकाऱ्यांकडून करण्यात आली. कर्ज मंजुरीच्या किंवा वाटपाच्या काही तातडीच्या कामासाठी बोलावले असावे, या समजुतीने शेतकरी बँकेत पोहोचले. मात्र, तिथे गेल्यावर त्यांना कर्जाची रक्कम देण्याऐवजी, (पान २ वर)

# जिल्ह्यातून चारा बाहेर नेण्यास बंदी- -जिल्हाधिकारी

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात यावर्षी झालेल्या अल्प पावसामुळे आणि दुष्काळी परिस्थितीमुळे भविष्यात गुरांच्या चाऱ्याची टंचाई भासू नये, यासाठी जिल्ह्याच्या हद्दीबाहेर हिरवा व वाळलेला चारा, गवत आणि वैरणीची विक्री व वाहतूक करण्यास तातडीने बंदी घालण्यात आली आहे. यासंदर्भातील आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी आशिष येरेकर यांनी जारी केले आहेत.



सन २०२६ च्या खरीप हंगामात घोषित करण्यात आलेल्या 'ट्रिगर-१' मध्ये जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने चारा उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे पशुधनाला पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध राहावा या उद्देशाने 'महाराष्ट्र (पान २ वर)